# महाराष्ट्र विधानसभा

**पहिले अधिवेशन, २०२३**

**अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी**

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

## मंगरूळपीर नगरपरिषद (जि.वाशिम) येथील स्वामी विवेकानंद सुशिक्षित बेरोजगार सहकारी संस्थेला दुकान गाळे वाटप करण्याबाबत

**(१) ३२४२१ (११-०१-२०२२). श्री.प्रशांत बंब (गंगापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मंगरूळपीर नगरपरिषद (जि.वाशिम) येथील मंगरूळपीर बस स्टँड जवळ नगरपरिषदेच्या हद्दीत व्यापारी संकुलाचे बांधकाम केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या व्यापारी संकुलनामध्ये स्वामी विवेकानंद सुशिक्षित बेरोजगार सहकारी संस्थेने शासन निर्णयाप्रमाणे दहा टक्के कोट्यामधून दुकान गाळे मिळणेबाबत नगर परिषद मंगरूळपीर यांचेकडे अर्जान्वये मागणी केली असून, राज्य शासनाकडून नगरपरिषदेला पत्र व्यवहार करण्यात आला आहे, हे ही खरे आहे कय,

(३) असल्यास, स्वामी विवेकानंद सुशिक्षित बेरोजगार सहकारी संस्थेला दुकान गाळे वाटप करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१३-०१-२०२३) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

(३) सहाय्यक संचालक, नगररचना, वाशिम यांनी गाळे मुल्यांकन करुन दिले असून तद्नंतर जिल्हाधिकारी, वाशिम यांच्या अध्यक्षतेखाली त्रिसदस्यीय समितीसमोर दर निश्चिती झाल्यावर त्यांच्याकडून प्राप्त दरानुसार व गाळेवाटप नियमानुसार सभेपुढे प्रस्ताव ठेवून त्यांच्या मंजूरीनंतर गाळे वितरण करण्याचे नगरपरिषदेचे नियोजन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

## मुंबई महानगरपालिका मध्ये सेंटर वर्क कॉन्ट्रक्ट कामात व ई-कोटेशन निविदा प्रक्रियेत अनियमितता आढळल्याबाबत

**(२) ३२९६५ (११-०१-२०२२). श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगरपालिके मध्ये सेंटर वर्क कॉन्ट्रक्ट कामात व ई-कोटेशन निविदा प्रक्रियेत अनियमितता आढळल्याने मुंबई महापालिकेने ८३ कर्मचाऱ्यांविरोधात चौकशी केली असल्याची बाब दिनांक १६ सप्टेंबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर चौकशीत ८३ पैकी २० कर्मचाऱ्यांना दोषमुक्त जाहीर केले असून ६३ कर्मचारी व अभियंत्यांना दोषी ठरविण्यात आले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी संबंधित दोषींवर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१३-०१-२०२३) :** (१) व (२) हे खरे आहे.

(३) सदर प्रकरणी अनियमिततांच्या अनुषंगाने सकृतदर्शनी जबाबदार असणाऱ्या ८३ कर्मचाऱ्यांवर आरोपपत्रे

बजाविण्यात आली व तद्रुषंगाने त्रिसदस्यीय चौकशी समितीने खात्यांतर्गत चौकशी करुन सादर केलेल्या चौकशी अहवालावर महानगरपालिका आयुक्त यांनी ८३ कर्मचाऱ्यांपैकी २० कर्मचाऱ्यांबाबत दोषमुक्तीचे आणि ५० कर्मचाऱ्यांबाबत किरकोळ स्वरूपाच्या शिक्षेचे आदेश पारित केले आहेत. उर्वरीत १३ कर्मचाऱ्यांबाबत जबर शिक्षेचे आदेश पारित केले आहेत.

किरकोळ शिक्षा केलेल्या ५० कर्मचाऱ्यांपैकी ३० कर्मचाऱ्यांनी त्यांच्या शिक्षादेशाविरुध्द सादर केलेल्या अपील अर्जाच्या अनुषंगाने ४ कर्मचाऱ्यांना दोषमुक्त करुन १३ कर्मचाऱ्यांच्या किरकोळ शिक्षेत बदल करण्यात आला. तसेच उर्वरित १३ कर्मचाऱ्यांच्या किरकोळ शिक्षा कायम करण्यात आल्या.

जबर शिक्षा झालेल्या १३ कर्मचाऱ्यांवर 'कारणे दाखवा नोटिस' बजाविण्यात आल्या होत्या. तद्नंतर एका कर्मचाऱ्याचे निधन झाल्याने त्याचे आरोपपत्र वगळण्याचे आदेश पारित केले. उर्वरित १२ कर्मचाऱ्यांपैकी ७ कर्मचाऱ्यांच्या शिक्षा कायम करण्यात आल्या व ५ कर्मचारी कार्यकारी अभियंता या पदाचे असल्याने, त्यांना शिक्षा देण्यास स्थायी समिती सक्षम प्राधिकारी असल्याने, त्यांच्या शिक्षेसंदर्भात स्थायी समितीस प्रस्ताव सादर केल्यानंतर स्थायी समितीने पारित केलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने महानगरपालिकेमार्फत पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबईतील कस्तुरबा रूग्णालयातील पहिल्या जनुकीय क्रमनिर्धारण (जीनोम सिक्वेसिंग) प्रयोगशाळेत डेल्टा बाधित असल्याबाबत

**(३) ३२९६७ (०२-०२-२०२२). श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील कस्तुरबा रूग्णालयातील पहिल्या जनुकीय क्रमनिर्धारण (जीनोम सिक्वेसिंग) प्रयोगशाळेत १८८ नमुन्यांची चाचणी केली असून यात १२८ रुग्ण डेल्टा बाधित असल्याची बाब २४ ऑगस्ट, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर विषयी शासनातर्फे कोणती तातडीची उपाययोजन करण्यात आली वा येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे (१३-०१-२०२३) :**(१) मुंबईतील कस्तुरबा रुग्णालयामध्ये कार्यरत झालेल्या पहिल्या जनुकीय क्रमनिर्धारण प्रयोगशाळेत १२२ रुग्णांमध्ये कोविड विषाणूंचे संरचनात्मक प्रकार आढळून आले असल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.
(२) बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत डेल्टाबाधित रुग्णांबाबत खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात येतात:-
• रुग्णांची सविस्तर माहिती घेणे

रुग्णाच्या आजाराचे स्वरुप (सौम्य/गंभीर), रुग्णालयीन उपचार, आंतरराष्ट्रीय प्रवासाची माहिती, लसीकरणाची स्थिती इत्यादीबाबत सविस्तर माहिती संकलित करण्यात येते. तसेच आवश्यकतेनुसार डेल्टाबाधित रुग्णांचे अलगीकरण व उपचार करण्यात येतात.
• युध्दपातळीवर निकट सहवासितांचा शोध

रुग्णाच्या निकट सहवासितांचे पहिल्या व पाचव्या दिवशी तसेच लक्षणे आढळल्यास नंतरही चाचणी केली जाते व त्यापैकी पॉझिटीव्ह आल्यास त्याचे नमुने प्रयोगशाळेत जीनोम सिक्वेसिंगसाठी पाठविण्यात येतात. सहवासितांचे आवश्यकतेनुसार अलगीकरण व उपचार करण्यात येतात.
• जीनोम सिक्वेसिंगचे अहवाल उपलब्ध व्हावेत याकरिता कस्तुरबा रुग्णालयाच्या पीसीआर प्रयोगशाळेत जीनोम सिक्वेसिंगची सुविधा सुरु करण्यात आली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**यवतमाळ जिल्हयातील वणी नगर परिषदेच्या हद्दवाढी संदर्भात नकाशा शासनाकडे सादर केला नसल्याबाबत**

**(४) ३३८०४ (०२-०२-२०२२). श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), श्री.अमित झनक (रिसोड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ जिल्ह्यातील वणी नगरपरिषदेच्या हद्दवाढी संदर्भात शासनाने दिनांक २८ मार्च, २०१८ रोजी वणी नगरपरिषदेने हद्दवाढीचा निर्णय घेतला परंतू वणी नगरपरिषदेने हद्दवाढीचा नकाशा शासनाकडे सादर केला नसल्याचे माहे ऑक्टोबर, २०२१ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त शासन निर्णय येण्यापूर्वीच वाढीव विकास आराखडा वणी नगर परिषद प्रशासनाने सादर केला परंतू त्यामध्ये कोणतीही हद्दवाढ केलेली नाही त्यामुळे हद्दवाढीचा शासन निर्णय २८ मार्च, २०१८ रद्द करुन नविन निर्णय घेऊन शहराच्या हद्दवाढीबाबत शासन मुख्याधिकारी, वणी नगरपरिषद यांना आदेश देण्यात आला वा येणार आहे काय,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१३-०१-२०२३) :** (१) व (२) शासनाने दिनांक २८ मार्च, २०१८ रोजीच्या अधिसूचने अन्वये वणी नगरपरिषद क्षेत्राची हद्दवाढ केली आहे.

• हद्दवाढ क्षेत्रासाठी विकास योजना करण्याकरीता दिनांक ३/१२/२०२१ अन्वये राजपत्रात इरादा प्रसिद्ध केला असून त्याबाबत नगरपरिषदेकडून पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नागभिड (जि.चंद्रपूर) येथील अनेक लाभार्थी रमाई घरकुल योजनेपासून वंचित असल्याबाबत**

**(५) ३३९४० (२३-११-२०२१). श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), श्री.अमित झनक (रिसोड), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागभिड (जि.चंद्रपूर) नगर परिषदेत प्रशासनाच्या अनास्थेमुळे रमाई घरकुल योजनेचे अनेक प्रस्ताव सुमारे दोन वर्षापासून प्रलंबित असल्याचे दिनांक १८ ऑक्टोबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यामुळे अनेक लाभार्थ्यांना असुरक्षित घरांत रहावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी करुन रमाई घरकुलांच्या लाभार्थ्यांच्या प्रस्तावांना मंजूरी देण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१३-०१-२०२३) :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) रमाई आवास योजनेअंतर्गत घरकुलांसाठी एकूण १७३ अर्ज प्राप्त झाले होते. त्यापैकी १३९ अर्ज समाजकल्याण विभागाकडे पाठविण्यात आले.

• त्यापैकी ४९ लाभार्थ्यांना प्रधानमंत्री आवास योजनेमधून घरकुलाचा लाभ मिळालेला असल्याने त्या योजनेत पात्र ठरले आहेत.

• उर्वरित ९० लाभार्थ्यांपैकी ४७ अर्ज अपात्र ठरले आहेत. उर्वरित ४३ पात्र अर्जापैकी २३ लाभार्थ्यांचे प्रस्ताव रमाई आवास योजनेअंतर्गत मंजूर झाले आहेत. उर्वरित २० लाभार्थ्यांबाबत त्रुटीची पूर्तता करुन प्रस्ताव सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण चंद्रपूर यांच्या मान्यतेसाठी पाठविण्याची कार्यवाही नगरपरिषदेकडून करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### शहापूर (जि.ठाणे) तालुक्यात गॅबियन पध्दतीचे बंधारे बांधण्याबाबत

**(६) ३४५०४ (०५-०१-२०२२). श्री.दौलत दरोडा (शहापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील कृषि विभागाने मृद आणि जलसंधारणाच्या माध्यमातून "पाणी अडवा,पाणी जिरवा" या मोहिमे अंतर्गत गॅबियन पध्दतीचे बंधारे हे महत्वाचे ठरत असतांना ठाणे जिल्हयातील तीव्र पाणी टंचाईग्रस्त शहापूर तालुक्यात मात्र गेल्या

(२) वर्षापासून गॅबियन बंधा-यांना फाटा देण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

२. असल्यास, या संदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीअंती काय निदर्शनास आले,

(३) असल्यास, उक्त ठिकाणची पाणी टंचाई दूर करण्यासाठी गॅबियन पध्दतीचे बंधारे बांधण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,.

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे (१०-०१-२०२३) :** (१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) "पाणी अडवा, पाणी जिरवा" या मोहिमेंतर्गत राज्यात जलयुक्त शिवार अभियान, गतिमान पाणलोट विकास कार्यक्रम, वसुंधरा पाणलोट विकास कार्यक्रम, इ. योजनांद्वारे प्रामुख्याने क्षेत्र उपचाराची कामे घेण्यात येतात. ठाणे जिल्ह्यातील शहापूर तालुक्यात जलयुक्त शिवार अभियान, गतिमान पाणलोट विकास कार्यक्रम, प्रधानमंत्री कृषि सिंचन योजना - पाणलोट विकास घटक १.० अंतर्गत सन २०१९-२०, २०२०-२१ व २०२१-२२ मध्ये अनघड दगडी बांधाची कामे घेण्यात आलेली आहेत. सदर कामे पूर्ण झालेली असून परिणाम स्वरुप भूजल पातळीमध्ये वाढ झाल्याचे आढळून आलेले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### मैदंर्गी नगर (जि.सोलापूर) पंचायत येथील प्रभारी मुख्याधिकारी यांच्यावर कारवाई करण्याबाबत

**(७) ३४८८३ (०२-०२-२०२२). श्री.संजय गायकवाड (बुलढाणा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मेदंर्गी नगर (जि.सोलापूर) पंचायत येथील प्रभारी मुख्याधिकारी श्री.एन.के.पाटील यांनी कार्यालयातील करनिर्धारक श्री.अमोल अर्जुन जाधव या कर्मचाऱ्यांस अरेरावी च्या भाषेमध्ये शिवीगाळ केल्याप्रकरणी चौकशी करुन संबधित मुख्याधिकारी यांना बडतर्फ करणेबाबत दि.२३ फेब्रुवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास महाराष्ट्र राज्य नगर परिषद, नगर पंचायत कर्मचारी / संवर्ग कर्मचारी संघटना यांनी मा. मुख्यमंत्री व नगरविकास मंत्री यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे केली आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१३-०१-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) श्री. एन.के.पाटील हे मैंदर्गी नगरपरिषदेमध्ये दिनांक २०/२/२०२० ते ३०/७/२०२१ या कालावधीत मुख्याधिकारी म्हणून कार्यरत होते. त्यावेळी श्री. अमोल अर्जून जाधव, कर निर्धारण व प्रशासकीय अधिकारी म्हणून कार्यरत होते.

• श्री. अमोल जाधव यांना श्री. एन.के.पाटील यांनी शिवीगाळ केल्याचा मुद्दा नमूद करुन दिनांक २३/२/२०२० रोजी महाराष्ट्र राज्य नगरपरिषद, नगरपंचायत कर्मचारी संघटना यांनी लेखी स्वरुपात निवेदन दिले होते.

• दरम्यान श्री. अमोल जाधव यांनी जिल्हाधिकारी कार्यालयास लेखी म्हणणे सादर करुन त्यांची कोणतीही तक्रार नाही, त्याबाबतचा अर्ज निकाली काढावा, असे निवेदन दिले असून जिल्हाधिकारी, सोलापूर यांनी तक्रारअर्ज निकाली काढला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सोलापूर महानगरपालिकेअंतर्गत येणाऱ्या ( ता.जि. सोलापूर ) बेघर निवारण केंद्रामधील व्यक्तींसाठी व रस्त्यावर फिरणाऱ्या बेघर व्यक्तींचे लसीकरण करण्याबाबत**

**(८) ३५४५३ (०२-०२-२०२२). श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सोलापूर महानगरपालिकेअंतर्गत (ता.जि. सोलापूर) येणाऱ्या बेघर निवारण केंद्रामधील व्यक्तींसाठी व रस्त्यावर फिरणाऱ्या बेघर व्यक्तींचे लसीकरण झाले नसल्याचे माहे ऑक्टोबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कोरोनाच्या तिसऱ्या लाटेचा विचार करुन शहरातील बेघर निवारण केंद्र आणि रस्त्यावर जीवन कंठणाऱ्या बेघरांना कोविड प्रतिबंधक लस देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत

**श्री. एकनाथ शिंदे (१३-०१-२०२३) :** (१) हे खरे नाही.
(२) सोलापूर महानगरपालिकेने कोविड कालावधीत शहरातील बेघर निवारा केंद्रामधील व्यक्तिंसाठी व बेघर व्यक्तींसाठी दिनांक ३ जून, २०२१ रोजी स्वतंत्र लसीकरण सत्राचे आयोजन करुन अशा व्यक्तींना लसीकरणाचे डोस दिले आहेत.
• तसेच महानगरपालिकांतर्गत १५ नागरी आरोग्य केंद्रामार्फत प्राधान्याने लसीकरण करुन शहरातील प्रमुख मंदिरातील भिक्षा मागणारे बेघर तसेच रस्त्यावर फिरणाऱ्या बेघर व्यक्तींना १००% लसीकरण होईल, अशा रितीने नियोजन करुन लसीकरण केले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**उल्हासनगर महानगर पालिकेतील वादग्रस्त नगररचनाकार यांनी बांधकामांना परवानग्या व सुधारित बांधकाम परवानग्या दिल्याबाबत**

**(९) ३५४७० (१७-०१-२०२२). श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.कुमार आयलानी (उल्हासनगर), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ठाणे जिल्ह्यातील उल्हासनगर महानगरपालिकेचे वादग्रस्त नगररचनाकार श्री.अ.पा.गुरगुले यांनी सेवानिवृत्ती पूर्वी ६ दिवस अगोदर सुमारे ७० ते ८० बांधकाम परवानग्या व सुधारित बांधकाम परवानग्या दिल्या असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, श्री.गुरगुले यांनी सेवा निवृत्तीपूर्वी ६ दिवसाच्या कालावधीमध्ये देण्यात आलेल्या बांधकाम परवानग्या व सुधारित बांधकाम परवानग्या मध्ये बांधकाम नियंत्रण नियमावली व चटई क्षेत्र निर्देशांकाचे उल्लंघन केल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने सदरच्या बांधकाम परवानग्या व सुधारित बांधकाम परवानग्या देताना अनियमितता झाल्याने या परवानग्यांची संचालक, नगररचना यांचेकडून फेर तपासणी करून दोषी असल्यास नगररचनाकार, श्री.गुरगुले व कनिष्ठ अभियंता, श्री.बुडगे यांच्यावर कोणती कठोर कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१३-०१-२०२३) :** (१) अशा आशयाची स्थानिक लोकप्रतिनिधींची तक्रार प्राप्त झाली असल्याचे उल्हासनगर महानगरपालिकेने कळविले आहे.
(२), (३) व (४) सदर प्रकरणी तपासणी सुरु असल्याचे उल्हासनगर महानगरपालिकेने कळविले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पंढरपूर (जि.सोलापूर) तालुका शहर विकास योजना दुसरी सुधारीत मध्ये मैदानासाठी आरक्षित केलेल्या जागेवर मलशुध्दीकरण मंजुरी करण्याबाबत

**(१०) ३५५३४ (०२-०२-२०२२). श्री.समाधान अवताडे (पंढरपूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पंढरपूर (जि.सोलापूर) तालुका शहर विकास योजना दुसरी सुधारीत मध्ये नमामी चंद्रभागा प्रकल्पाअंतर्गत पंढरपूर नगरपरिषद येथील सि.स.नं.१९८/१९९ अंबाबाई पटांगण येथील आरक्षण क्र.१२ खेळाचे मैदान क्षेत्रफळ १८६००.०० चौ.मी. व आरक्षण क्र.१२ अ दुकान केंद्र क्षेत्रफळ २१८०.०० चौ.मी. असे एकूण २०७८० चौ.मी. इतके क्षेत्रफळ मैदानासाठी आरक्षित केले असून या जागेवर नव्याने शौचालय प्रस्तावित न करता नव्याने मलशुध्दीकरण मंजुरी करण्याबाबतचे निवेदन मा.विभागीय आयुक्त, पुणे विभाग यांना दि. ७ ऑक्टोबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे,
(३) असल्यास, निर्णयाचे स्वरुप काय,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१३-०१-२०२३) :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) पंढरपूर नगरपरिषदेतील सि.स.नं. १९८/१९९ अंबाबाई पटांगण येथील आरक्षित जागेवर नमामी चंद्रभागा योजनेतून अथवा पंढरपूर तिर्थक्षेत्र विकास आराखड्यातून कोणतेही शौचालय किंवा मलशुद्धीकरण केंद्र बांधण्याचे प्रस्तावित नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अर्जुनी-मोरगांव (जि.गोंदिया) नगरपंचायतीच्या हद्दीतील अतिक्रमणकारी घरांना तात्काळ जमीनपट्टे वाटप होणेबाबत

**(११) ३५९७३ (२३-११-२०२१). श्री.मनोहर चंद्रिकापूरे (अर्जुनी-मोरगांव) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अर्जूनी-मोरगांव (जि.गोंदिया) नगरपंचायत हद्दीतील शासकीय जमिनीवर मागील अनेक वर्षांपासून कच्चे घर धारकांना मालकीपट्टे वाटप न झाल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सर्वांसाठी घरे २०२२ अंतर्गत अर्जुनी मोरगांव विधानसभा क्षेत्रातील अतिक्रमण धारकांना मालकीपट्टे वाटप होवून निवासाकरिता निधी उपलब्ध करण्याची नगरविकास विभागाची योजना आहे, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच नगरविकास विभागाचे ६ मार्च, २०१८ च्या शासन निर्णयानुसार अतिक्रमण जमीनीवरील मालकीपट्टे वाटप होवून घरकुल योजना राबविण्याकरिता शासन स्तरावर कार्यवाही झाली आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन अतिक्रमणधारी घरांना तात्काळ जमीनपट्टे वाटप करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१३-०१-२०२३) :** (१), (२), (३) व (४) शासनाने सर्वांसाठी घरे-२०२२ या धोरणाची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या क्षेत्रात असलेल्या महसूल विभागाच्या अखत्यारीतील शासकीय जमीनीवरील अतिक्रमणे नियमानुकूल करण्याबाबत नगर विकास विभाग, दिनांक १७/११/२०१८ रोजीच्या शासन निर्णयान्वये निर्णय घेतला आहे.

• त्यानंतर नगर विकास विभाग, दिनांक ६ मार्च, २०१९ रोजीच्या शासन निर्णयान्वये नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या क्षेत्रात असलेल्या राज्य शासनाच्या सर्व विभागांच्या (वन विभाग वगळून) जमीनीवरील अतिक्रमणे नियमानुकूल करणेबाबत निर्णय घेतला आहे.

• पंतप्रधान आवास योजनेच्या लाभासाठी अर्जुनी नगरपंचायतीकडे प्राप्त झालेल्या अर्जांपैकी २४९ अर्जदारांचे नगरपंचायत हद्दीतील गट क्रमांक २६७/१, १८२, १८५, २४४, २९० व २८८ मध्ये अतिक्रमण असल्याचे दिसून आले आहे. सदर जागा ७/१२ च्या नोंदीनुसार "सरकार" अशी नोंद असून इतर हक्कामध्ये झुडपी जंगल, मोठ्या झाडांचे जंगल अशा नोंदी आहेत. ही बाब DPR तयार करतानाच दिसून आल्याने या अर्जदारांचा समावेश DPR मध्ये करण्यात आलेला नाही.

• वरीलप्रमाणे अर्जुनी नगरपंचायत अंतर्गत प्राप्त झालेल्या २४९ व्यक्तींना, वन विभागाने हरकत घेतल्याने या योजनेचा लाभ देता आला नाही. यासंदर्भात केंद्र शासनाची मंजूरी मिळविण्याच्या दृष्टीने वन विभागाशी सल्लामसलत करुन योग्य ती कार्यवाही नगरपंचायतीमार्फत सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अक्कलकोट रोड (जि.सोलापूर) एमआयडीसीमध्ये पायाभूत सोयी-सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत**

**(१२) ३६३७४ (१७-०१-२०२२). कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अक्कलकोट रोड (जि. सोलापूर), एमआयडीसीमध्ये सन १९९२ मध्ये पायाभूत सोयी-सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी सोलापूर नगरपालिकेकडे वर्ग करण्यात आले, तथापि, तेथे पाणी, रस्ते, गटारे, विद्युत व्यवस्था, इ. पायाभूत सुविधा उपलब्ध करण्यात आल्या नाहीत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यामुळे तेथील उद्योग वाढीस अडचणी येत असून निर्यातीवरही परिणाम होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार सदरहू एमआयडीसीमध्ये चांगल्या प्रकारच्या पायाभूत सोयी-सुविधा उपलब्ध करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१३-०१-२०२३) :** (१) व (२) हे खरे नाही.

(३) सन १९९२ पासून सोलापूर महानगरपालिकेच्या हद्दवाढ क्षेत्रात MIDC क्षेत्र समाविष्ट झाल्याने सदर क्षेत्रासाठी महानगरपालिकेकडून पाणी पुरवठा, रस्ते, विद्युत, ड्रेनेज इत्यादी पायाभूत सुविधा देण्यात येतात.

• महानगरपालिकेकडून ३ ते ४ दिवसाआड ४ MLD इतके पाणी MIDC भागास पुरविण्यात येते.

• MIDC परिसरात जिल्हा नगरोत्थान योजना तसेच महानगरपालिकेच्या निधीमधून रस्ते तयार करण्यात आले असून महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान योजना अंतर्गत देखील विविध रस्त्यांची कामे करण्यात आली आहेत.

• MIDC क्षेत्रात १३४१ LED दिवे बसविण्यात आले आहेत. त्याची देखभाल व दुरुस्ती महानगरपालिकेकडून करण्यात येते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सोलापूर महानगरपालिकेतील रोजंदारी व बदली कामगारांना सेवेत कायम करुन त्या कर्मचाऱ्यांना सातवा वेतन आयोग लागू करण्याबाबत

**(१३) ३६३९३ (१७-०१-२०२२). कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर महानगरपालिकेतील विविध संवर्गातील रोजंदारी व बदली कामगारांना सेवेत कायम करुन त्या कर्मचाऱ्यांना सातवा वेतन आयोग लागू करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी नगरविकास मंत्री महोदयांकडे दिनांक २८ सप्टेंबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास निवेदन दिले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने सोलापूर महानगरपालिकेतील रोजंदारी व बदली कामगारांना सेवेत कायम करण्याबाबत व सातवा वेतनाचा लाभ देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१३-०१-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) सोलापूर महानगरपालिकेच्या आकृतीबंधास शासनाने दिनांक २८ डिसेंबर, २०२१ रोजी एकूण ४६१२ इतक्या पदांस मान्यता दिलेली आहे. त्यामध्ये बिगारी, झाडूवाली, क्षेत्र कार्यकर्ता यांची नव्याने २०६ इतक्या पदांना मान्यता दिली आहे.

• तसेच सोलापूर महानगरपालिकेतील अधिकारी / कर्मचारी यांना ७ व्या वेतन आयोगाच्या शिफारशीनुसार वेतनश्रेणी लागू करण्याबाबत दिनांक १२ जानेवारी, २०२२ रोजी मान्यता दिली आहे.

• सोलापूर महानगरपालिकेतील १९९५ पूर्वीच्या रोजंदारी सेवक झाडूवाली, बिगारी व मलेरिया फिल्ड वर्कर मधील १३१ सेवकांना नियमित करण्यास दिनांक २०/१०/२०२२ रोजीच्या शासन निर्णयान्वये मान्यता दिली आहे.

• सन १९९५ नंतरच्या रोजंदारी / बदली सेवकांबाबत सोलापूर महानगरपालिका यांच्याकडून माहिती मागविण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या बी व सी वॉर्डमध्ये अधिकारी व कर्मचारी यांच्या संगनमताने आर्थिक अनियमितता करून अनधिकृत बांधकामांना प्रोत्साहन देणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत

**(१४) ३६३९६ (०२-०२-२०२२). श्री.रत्नाकर गुट्टे (गंगाखेड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या बी व सी वॉर्डमध्ये मोठया प्रमाणात अनधिकृत बांधकामे करण्यात येत असून सदरहू अनधिकृत बांधकामांबाबत वारंवार तक्रारी दाखल करूनही सदरहू अनधिकृत बांधकामे निष्कासित करण्याबाबत महानगरपालिका अधिकारी व कर्मचाऱ्यांकडून कोणतीच कारवाई करण्यात येत नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बी वॉर्डमधील मोहम्मद अली रोड येथील ईबे कॅस्टेल या हेरिटेज इमारतीत शेवटचे दोन मजले अनधिकृतरित्या उभारण्यात येवून तेथे ड्युप्लेक्स सदनिका बांधण्यात आल्या आहेत, तर युसुफ मेहेर अली, मुंबादेवी येथील झुबैदा कॅसेल ही दुमजली इमारत पाडून या ठिकाणी ७ मजल्यांचे एलिझंट हॉटेल अनधिकृतरित्या उभे करून सुरू करण्यात आले आहे तसेच ११७/११९, काझी सय्यद स्ट्रीट या इमारतीच्या गच्चीवर अनधिकृतरित्या सदनिका बांधण्यात आल्या असून, बी वॉर्डात अशीच आणखी २१ अनधिकृत बांधकामे असल्याचे माहे मे, २०२१ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) तसेच सक्षम प्राधिकाऱ्याची मान्यता न घेताच सी वॉर्डमधील १) ५९, इस्माईल कर्टे रोड २) ३०-३२, मस्जिद स्ट्रीट ३) १४०, घोगारी मोहल्ला ४) १४२, घोगारी मोहल्ला ५) ५, चंदनवाडी ६) ५७/६१, किका स्ट्रीट ७) ३१६/३२०, सुभानअल्लाह अपार्टमेंट, ईआर रोड, पायधुनी, ८) ४४, उमर अली स्ट्रीट, ९) १११/१११ ए, ओल्ड ह्युमन गल्ली या इमारती उभारण्यात आल्या असून यासारखी आणखी बरीच अनधिकृत बांधकामे डी वॉर्डमध्ये करण्यात आली असल्याचे माहे मे, २०२१ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरहू अनधिकृत बांधकामांवर निष्कासनाची कारवाई करण्याकरिता लाईफ इन लाईट या सेवाभावी संस्थेने माहे एप्रिल,२०२१ मध्ये वा त्या दरम्यान आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका, माहे मार्च, २०२१ मध्ये वा त्या दरम्यान महापौर, बृहन्मुंबई महानगरपालिका, माहे फेब्रुवारी, २०२१ मध्ये वा त्या दरम्यान सहाय्यक आयुक्त व सहाय्यक अभियंता सी वॉर्ड, माहे डिसेंबर २०२० मध्ये वा त्या दरम्यान आयुक्त व सहाय्यक आयुक्त सी वॉर्ड, माहे मार्च, २०२० मध्ये वा त्या दरम्यान आयुक्त व उपायुक्त (झोन १), माहे नोव्हेंबर, २०२० मध्ये वा त्या दरम्यान आयुक्त, बृहन्मुंबई महागनरपालिका / उपायुक्त परिमंडळ १ / सहाय्यक आयुक्त (बी वॉर्ड) यांना अशा आजवर १० पेक्षा अधिक तक्रारी सादर केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(५) तसेच सदरहू अनधिकृत बांधकामे निष्कासित करण्याबाबत गेल्या ३ वर्षांपासून सातत्याने तक्रारी सादर करुनही या प्रकरणी निष्कासनाच्या कारवाईस होत असलेला वेळकाढूपणा पाहता या प्रकरणी स्वत:च्या आर्थिक फायद्याकरिता दुर्लक्ष करणारे संबंधित महानगरपालिका अधिकारी व वॉर्ड ऑफिसर यांच्यावर तातडीने कारवाई करून सदरहू अनधिकृत बांधकामे तातडीने निष्कासित करण्याबाबत शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, असल्यास त्याचा तपशील काय आहे,
(६) नसल्यास, संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यास व अनधिकृत बांधकामांवर निष्कासनाची कारवाई करण्यातस होत असलेल्या विलंबाची कारणे काय आहेत व सदरहू कारवाई किती कालावधीत करण्यात येणार असून या प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेता अनधिकृत बांधकामांना संरक्षण देणारे संबंधित वॉर्ड ऑफिसर यांना निलंबित करण्याबाबत शासनाची नेमकी भूमिका काय आहे,
(७) सदरहू अनधिकृत बांधकामांना ३५४, ३५४ अे, ४८८ अन्वये नोटीसी पाठविल्यानंतर सदरहू नोटीसीच्या अनुषंगाने पुढील कार्यवाही करण्याबाबत संबंधित अधिकारी हे कर्तव्यात कसूर करीत असून महानगरपालिकेचा स्वत:चा विधी विभाग असूनही संबंधित अनधिकृत बांधकामांना वेळोवळी स्थगिती आदेश कसे मिळतात याबाबत शासनाने विचार करून एमआरटीपी कायद्यांतर्गत आयुक्त, महानगरपालिका यांना असलेल्या अधिकाराचा वापर करून अनधिकृत बांधकाम करणाऱ्यांवर व त्याकडे दुर्लक्ष करणाऱ्या संबंधित वॉर्ड ऑफिसर आणि संबंधित अधिकारी यांचे विरूध्द एफआयआर नोंदवून कायदेशीर कारवाई करून संबंधित अधिकाऱ्यांचे निलंबन करण्याबाबत कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१३-०१-२०२३) :** (१) हे खरे नाही.

बृहन्मुंबई महानगरपालिका हद्दीत कोणतीही अनधिकृत बांधकामे आढळल्यास, महानगरपालिकेच्या प्रचलित धोरणानुसार मुंबई महानगरपालिका अधिनियम १८८८ व महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम १९६६ च्या कलमांतर्गत योग्य ती नोटीस बजावून पुढील उचित कार्यवाही करण्यात येते असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(२), (३), (४), (५), (६) व (७)

सदर प्रकरणी बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात आली आहे:-
ईबे कॅस्टेल सदर इमारतीचे स्थळ निरीक्षण केले असता, सदर ठिकाणी कोणत्याही प्रकारचे नवीन बांधकाम सुरु असल्याचे किंवा नजीकच्या काळात बाधंकाम झाल्याचे आढळून आले नाही.
झुबैदा कॅसेल सदर इमारत ही म्हाडाची उपकर प्राप्त इमारत असून, सदर इमारतीच्या दुरुस्तीचे काम हे इमारतीच्या जीर्ण परिस्थितीमुळे व म्हाडा प्राधिकरणामार्फत अदा करण्यात आलेल्या दिनांक ०८.०९.२०२० रोजीच्या ना-हरकत प्रमाणपत्रानुसार करण्यात येत आहे.

तथापि, सदर इमारतीतील राहत्या सदनिकेचा वापर व्यावसायिक वापराकरिता करण्यात येत असल्याचे दिसून आल्यानंतर सदर इमारतीचे मालक/ताबेदार यांना दिनांक ०१.०३.२०२१ रोजी महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम १९६६ अंतर्गत कलम ५३(१) अन्वये नोटीस बजावण्यात आली. तसेच, बेस्ट, अग्निशमन, सार्वजनिक आरोग्य विभाग, महानगरपालिकेचा जल विभाग व आरोग्य विभाग यांना त्यांच्या कार्यालयामार्फत सदर इमारतीवर कारवाई करण्याकरिता पत्रव्यवहार करण्यात आला आहे.

सदर इमारतीस देण्यात आलेल्या नोटीशीच्या अनुषंगाने मे. ट्रेड इन यांनी दिनांक २४.०३.२०२१ रोजी दिलेल्या कागदपत्रांची शहानिशा केल्यानंतर सदर प्रकरणी दिनांक ०५.०४.२०२१ रोजी अंतिम आदेश पारित करण्यात आले. तद्नंतर दिनांक १५.०५.२०२१ रोजी पायधुनी पोलीस ठाणे येथे संबंधित आरोपींविरुध्द प्रथम खबरी अहवाल (एफ.आय.आर.) नोंदवून सदर बांधकामावर दिनांक ०८.०६.२०२१ रोजी निष्कासन कारवाई आयोजित करण्यात आली होती. तथापि मे. ट्रेड इन यांनी मा. नगर दिवाणी सत्र न्यायालयात सूट क्र. ४२४०/२०२१ अन्वये स्थगिती आदेश प्राप्त केला आहे. तसेच, मा. नगर दिवाणी सत्र न्यायालयाच्या आदेशानुसार मे. ट्रेड इन यांना, नियमितीकरण प्रस्तावाच्या अनुषंगाने आवश्यक कागदपत्रे सादर करण्याकरिता ७ दिवसांचा कालावधी देण्यात आला असून, तद्नंतर महानगरपालिकेमार्फत कायद्यातील तरतुदीनुसार योग्य ती कार्यवाही करण्यात यावी असे मा. न्यायालयाने नमूद केले आहे. तथापि, मे. ट्रेड इन यांचा नियमितीकरणाचा प्रस्ताव आवश्यक अनुपालनकरिता तात्पुरता रद्द केला आहे.

११७/११९, काझी सय्यद स्ट्रीट

सदर प्रकरणी मुंबई महानगरपालिका अधिनियम १८८८ च्या कलम ३५४ ए अंतर्गत दिनांक ०६.०२.२०२१ रोजी नोटीस बजावण्यात आली असून, सदर अनधिकृत बांधकामावर बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत दिनांक १०.०२.२०२१, १९.०३.२०२१ व दिनांक २१.१०.२०२१ रोजी निष्कासन कारवाई करण्यात आली आहे.

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या "सी" वॉर्डमधील १) ५९, इस्माईल कर्टे रोड २) ३०-३२, मस्जिद स्ट्रीट ३) १४०, घोगारी मोहल्ला ४) १४२, घोगारी मोहल्ला ५) ५, चंदनवाडी ६) ५७/६१, किका स्ट्रीट ७) ३१६/३२०, सुभानअल्लाह अपार्टमेंट, ईआर रोड, पायधुनी, ८) ४४, उमर अली स्ट्रीट, ९) १११/१११ ए, ओल्ड ह्युमन गल्ली या इमारतींच्या अनधिकृत बांधकामांच्या तक्रारीवर मुंबई महानगरपालिका अधिनियम १८८८ च्या कलमांतर्गत नोटीस कारवाई करण्यात आली असून, त्यापैकी ५ अनधिकृत बांधकामांची प्रकरणे न्यायप्रविष्ठ आहेत व ३ अनधिकृत बांधकामे निष्कासित करण्यात आली आहेत. तसेच १ ठिकाणी कोणत्याही प्रकारचे बांधकाम सुरु अथवा नजीकच्या कालावधीमध्ये झाले असल्याचे आढळून आले नाही, असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

सदर अनधिकृत बांधकामांबाबतची प्रकरणे न्यायप्रविष्ठ असल्यामुळे व मागील सुमारे २ वर्षांपासून कोविड-१९ या विषाणूपासून उद्भवलेल्या रोगाच्या प्रादुर्भावामुळे मा. उच्च न्यायालयाच्या सुमोटो ३/२०२० अन्वये अनधिकृत बांधकामे निष्कासित न करण्याबाबत आदेश दिले होते.

---

**लोणावळा नगरपरिषदेअंतर्गत (ता.मावळ, जि.पुणे) झालेल्या आर्थिक गैरव्यवहाराबाबत**

**(१५) ३७६३९ (११-०१-२०२२). श्री.सुनिल शेळके (मावळ) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लोणावळा नगरपरिषद (ता.मावळ, जि. पुणे) प्रशासनाने नगरपरिषदेचा कोणताही ठराव पारित न करताच संबंधित कंत्राटदारास माहे मे, २०१२ मध्ये वा त्यादरम्यान रुपये १.५० कोटी अदा केले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त नगरपरिषदेने सन २०१६ पर्यंत कोणतीही कामे वा साहित्य लोणावळा नगरपरिषदेला उपलब्ध न करता सुमारे रुपये ८ कोटीहून अधिक रकमेचे आर्थिक नुकसान झाल्याप्रकरणी लोकप्रतिनिधींनी दिनांक २९ जानेवारी, २०२० रोजीच्या पत्रान्वये तक्रार दाखल केली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त तक्रारीच्या अनुषंगाने शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशी काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधितांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१३-०१-२०२३) :** (१), (२), (३) व (४) लोणावळा नगरपरिषदेने महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान अभियानांतर्गत भुयारी गटार योजनेच्या पहिल्या टप्प्याच्या कामात ठेकेदाराला करारनाम्यात तरतूद नसताना तत्कालिन अध्यक्षाच्या मंजूरीने रुपये १.५० कोटी मोबिलायझेशन ॲडव्हान्स प्रदान केले आहे.

• यासंदर्भात प्राप्त तक्रारी, मा.लोकप्रतिनिधी यांची निवेदने तसेच चौकशी अहवाल विचारात घेऊन, यासाठी तत्कालिन मुख्याधिकारी व नगरअभियंता यांच्याविरुद्ध महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम, १९७९ मधील नियम-८ खाली चौकशी करण्यात आली होती. प्रादेशिक विभागीय चौकशी अधिकारी, पुणे यांनी त्यांच्या चौकशी अहवालात त्यांनी तत्कालीन मुख्याधिकारी यांच्यावरील दोषारोप सिद्ध होत नसल्याचे निष्कर्ष काढले होते, तर तत्कालीन नगरअभियंता यांच्यावरील केवळ २ दोषारोप अंशत: सिद्ध होत असल्याचे निष्कर्ष काढले होते. हे निष्कर्ष शासनाने स्विकारुन या प्रकरणात नगरअभियंता यांना अंशत: सिद्ध झालेल्या दोषारोपांसाठी पुढील वेतनवाढ १ वर्षासाठी रोखण्याची शिक्षा दिनांक २८/९/२०२० रोजीच्या आदेशान्वये दिली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## रामटेक (जि.नागपूर) नगर परिषदेतील वाचनालयाच्या समस्यांबाबत

**(१६) ३९४२९ (१९-०४-२०२२). श्री.नानाभाऊ पटोले (साकोली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रामटेक (जि.नागपूर) नगरपरिषदेतील हुतात्मा स्मारकस्थित वाचनालयात सुविधांचा अभाव असल्याचे माहे नोव्हेंबर,२०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त नगरपरिषदेत सन २०१७ पासून एकही नविन पुस्तके विकत घेतलेली नाहीत, तर २०२१ पासून स्पर्धा परिक्षेसाठी लागणारी पुस्तके तसेच संगणकही विद्यार्थ्यांना मिळत नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी करुन या वाचनालयात वाचकांना अद्ययावत माहिती मिळेल यादृष्टीने सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१३-०१-२०२३) :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) रामटेक (जि.नागपूर) नगरपरिषदेतील हुतात्मा स्मारक स्थित वाचनालयात येणाऱ्या अभ्यासकांना पुस्तके, वृत्तपत्र वाचन करणे व त्यासंबंधीचे लिखाण करणे याकरीता पर्याप्त बैठकीची व्यवस्था, प्रसाधनगृह, पिण्याच्या पाण्याची सोय, पर्याप्त विद्युत व्यवस्था ही पूर्वीपासून आहेत. तसेच दैनिक वृत्तपत्रे हे वाचनालयामध्ये उपलब्ध आहेत.

• दरम्यान कोरोना कालावधीमध्ये शैक्षणिक संस्थेसह नगर परिषदेचे हुतात्मा स्मारक स्थित वाचनालय पुर्णत: बंद होते. त्यामुळे ह्या कालावधीत स्पर्धा परिक्षेसाठी लागणारी पुस्तके २०२१ पासुन खरेदी केलेली नव्हती. दरम्यान नगर परिषदेचे हुतात्मा स्मारक वाचनालयामध्ये स्पर्धा परिक्षांच्या अभ्यासक्रमांकरीता आवश्यक पुस्तके व इतर साहित्य खरेदी करण्यासाठी ७५,०००/- रुपये निधीची तरतुद करण्यात येत असुन नगरपरिषदेचे हुतात्मा स्मारक वाचनालयामध्ये स्पर्धा परिक्षांच्या अभ्यासकांकरीता आवश्यक पुस्तके, इतर साहित्य उपलब्ध करुन देण्यात आलेली आहेत. तसेच संगणक व इतर आवश्यक पुस्तके उपलब्ध करुन देण्याचे नियोजित आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## आमगांव नगरपरिषद( जि. गोंदिया) येथील निवडणूकाबाबत

**(१७) ४०८६४ (२५-०४-२०२२). श्री.सहसराम कोरोटे (आमगाव) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आमगांव नगरपरिषद (जि.गोंदिया) निवडणूका घेणे अत्यंत आवश्यक असून जेणेकरुन नगरपरिषदेचा कारभार सुरळीत चालेल व नगरपरिषदेची विकासकामे मार्गी लागतील याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी वेळोवेळी निवेदनाद्वारे मागणी करुन कोणती कार्यवाही झाली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील निवेदनाद्वारे मागणी करुन कार्यवाही न होण्यामागील कारणे काय आहेत,

(३) असल्यास, आमगांव नगरपरिषद जिल्हा गोंदिया निवडणूका घेण्याबाबत शासनस्तरावरुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. एकनाथ शिंदे (१३-०१-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) गोंदिया जिल्ह्यातील आमगांव, बनगांव, रिसामा, कुंभारटोली, पदमपूर, किंडगीपार, बिरसी व माल्ही या ग्रामपंचायतींचे नगरपरिषदेमध्ये रुपांतर करण्यात आले असून त्याबाबत दिनांक २ ऑगस्ट, २०१७ रोजी अंतिम अधिसूचना निर्गमित केली आहे.

• राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे दिनांक ११/८/२०१७ नुसार नगरपरिषद आमगांवची निवडणूक प्रक्रिया सुरु करण्यात आलेली होती.

• परंतु नगरपरिषद आमगांवच्या स्थापनेबाबत आमगांव नगरपरिषद कार्यक्षेत्रातील काही नागरिकांनी मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ नागपूर येथे रिट याचिका क्रमांक ५९००/२०१७ दाखल केलेले होते.

• सदर प्रकरणात मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ नागपूर यांनी दिनांक २८/११/२०१७ रोजी नगर विकास विभागाने निर्गमित केलेली अधिसूचना रद्द करुन निवडणूक प्रक्रिया रद्द करण्याबाबत आदेश निर्गमित केले आहेत.

• मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ यांनी दिनांक २८/११/२०१७ रोजी दिलेल्या निर्णयाच्या विरोधात मा.सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली येथे विशेष अनुमती याचिका क्रमांक ३३५९०/२०१७ दाखल करण्यात आली असून दिनांक २८/११/२०१७ च्या मा.उच्च न्यायालयाच्या आदेशाला स्थगिती दिली आहे. त्यानुसार सदर प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.

---

**महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळातील रिक्त असलेल्या पदावर कार्यरत कर्मचाऱ्यांना पदोन्नती देण्याबाबत**

**(१८) ४३४६२ (०९-०४-२०२२). श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या कामाची व्याप्ती, कार्यकक्षा व जबाबदारी वाढत असून प्रशासकीय अधिकारी पदावरील अधिकाऱ्यांना अतिरिक्त पदभार देऊन मंडळाचे प्रशासकीय काम करण्यात येत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सहाय्यक विधी अधिकारी ही पदे बऱ्याच वर्षापासून रिक्त असून इतर कनिष्ठ लिपिक संवर्गातील पदावर कार्यरत कर्मचाऱ्यांना सेवेत रुजू झाल्यापासून पदोन्नतीच्या संधी उपलब्ध झालेल्या नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने अनेक वर्षापासून रिक्त पदे भरणे तसेच कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांना पदोन्नती देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१२-०१-२०२३) :** (१) हे खरे नाही.

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळातील प्रशासकीय अधिकारी पदावर तदर्थ पदोन्नतीने नियुक्ती देण्यात आली आहे.

(२) हे खरे नाही.

सहाय्यक विधी अधिकारी संवर्गात पदोन्नती कोटयातील २ पदांपैकी १ रिक्त पद सन २०१८-१९ मध्ये भरण्यात आले असून निम्न संवर्गात कर्मचारी उपलब्ध नसल्याने दुसरे पद दिनांक ३१/१२/२०१८ पासून रिक्त आहे.

(३) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे सेवाप्रवेश नियम व पदोन्नतीसंबंधी शासनाचे नियम/शासन निर्णय यानुसार पदोन्नतीची रिक्त पदे नियमित भरण्यात येतात.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्य परिवहन महामंडळाच्या संप काळात महामंडळाने दिलेल्या मुदतीत कामावर हजर व गैरहजर असलेल्या कर्मचाऱ्यांबाबत**

**(१९) ४४६३७ (१६-०९-२०२२). श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्रीमती लताबाई सोनवणे (चोपडा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य परिवहन महामंडळाच्या कर्मचा-यांनी संप केल्यानंतर त्यांना कामावर रुजू होण्याकरीता महामंडळाने दिलेल्या मुदतीत किती कर्मचारी कामावर रुजू झाले आहेत,

(२) असल्यास, संपावर असलेले जे कर्मचारी अद्याप कामावर रुजू झाले नाहीत त्यांच्याबाबत महामंडळानी कोणता निर्णय घेतला आहे,
(३) असल्यास, जे कर्मचारी कामावर रुजू झाले त्यांना त्यांची देणी देण्याबाबत कार्यवाहीची सद्यःस्थिती काय आहे?

**श्री. एकनाथ शिंदे (१२-०१-२०२३) :** (१) राज्य परिवहन महामंडळाने दि.०८.०४.२०२२ च्या परिपत्रकीय आदेशान्वये दि.२२.०४.२०२२ पर्यंत एकूण ८२३६० कर्मचारी कामावर रूजू झाले आहेत.
(२) व (३) राज्य परिवहन महामंडळाने त्यांच्या दि.१२.१०.२०२२ च्या पत्रान्वये संपात सहभागी रा.प.कर्मचा-यांना दि.२७.१०.२०२२ पर्यंत कामावर रुजू होण्याबाबत सुचना दिल्या होत्या. त्यानुसार दि.१८.११.२०२२ पर्यंत ९५ कर्मचारी कामावर रूजू झाले आहेत.

सदर सुचनांमध्ये ''कामावर हजर झालेल्या रा.प. कर्मचा-यांना सेवा सलगतेसह रुजू करुन घेण्यात यावे. परंतु अनुपस्थितीच्या कालावधीसाठी त्यांना कोणतेही वेतन अथवा भत्ते तसेच कोणतेही आर्थिक लाभ देय होणार नाहीत'' अशा स्पष्ट सुचना आहेत. त्यामुळे सदयस्थितीत कोणतेही देणी प्रंलबित नाहीत.

---

## जळगाव महानगरपालिका अंतर्गत विभागीय चौकशी होऊन दोषारोप सिद्ध झालेल्या अधिकाऱ्यांची नस्ती गहाळ झाल्याबाबत

**(२०) ४५४३३ (२३-०९-२०२२). श्रीमती देवयानी फरांदे (नाशिक मध्य) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जळगाव महानगरपालिका अंतर्गत विभागीय चौकशी होऊन दोषारोप सिद्ध झालेल्या अधिकाऱ्यांची नस्ती अंतिम कारवाईसाठी जळगाव महानगरपालिकेच्या आस्थापना विभागात आल्यानंतर सदर नस्ती गहाळ करण्याचा गंभीर प्रकार निदर्शनास आलेला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, सदर चौकशीच्या अनुषंगाने संगनमत करून दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यास विलंब करणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२७-१२-२०२२) :** (१) हे खरे नाही.

जळगाव महानगरपालिकेच्या आस्थापना विभागातून विभागीय चौकशी होऊन दोषारोप सिध्द झालेल्या अधिकाऱ्याची कोणतीही नस्ती गहाळ झाल्याचे निदर्शनास आले नसल्याचे महानगरपालिकेने कळविले आहे.
(२) व (३) विभागीय चौकशी होऊन दोषारोप सिध्द झालेल्या अधिकाऱ्याची कोणतीही नस्ती गहाळ झाल्याचे निदर्शनास आले नसल्याने, याप्रकरणी कोणतीही चौकशी अथवा कारवाई करण्यात आलेली नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कर्हेगाव (ता. इगतपुरी जि. नाशिक) येथील दिव्यांग अपंग गरजू लाभार्थी लाभापासून वंचित असल्याबाबत

**(२१) ४५४५४ (२३-०९-२०२२). श्रीमती देवयानी फरांदे (नाशिक मध्य) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कर्हेगाव (ता.इगतपुरी जि. नाशिक) तसेच अनेक तालुक्यांतर्गत ग्रामपंचायतींमधील दिव्यांग अपंग गरजू लाभार्थ्यांना लाभापासून वंचित ठेवल्याचे दिनांक २५ मार्च, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने ग्रामपंचायतीनिहाय वंचित लाभार्थ्यांची संख्या निश्चित करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, दिव्यांग अपंग गरजू लाभार्थ्यांना त्वरीत लाभ देण्यासाठी तसेच प्रस्तुत प्रकरणांतील जबाबदार अधिकारी/कर्मचारी यांचेविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहेत.
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०७-१२-२०२२) :** (१) हे खरे नाही,
सन २०२०-२१ व सन २०२१-२२ मध्ये कर्हेगाव येथील दिव्यांग गरजु लाभार्थ्यांना लाभ देण्यात आलेला आहे,
(२) प्रश्न उद्भवत नाही,
(३) प्रश्न उद्भवत नाही,
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कोकणातील सर्व विभागांमध्ये चक्राकार पध्दतीने नोकरी भरती होत असल्याने विविध पदे रिक्त असल्याबाबत**

**(२२) ४५५०० (२५-०९-२०२२). श्री.योगेशदादा कदम (दापोली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोकणातील सर्व विभागांमध्ये चक्राकार पध्दतीने नोकर भरती होत असल्याने मोठया प्रमाणात विविध पदे रिक्त असल्याचे माहे मे,२०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू पदे रिक्त असल्यामुळे त्याचा विकासकामांवर परिणाम होऊन कार्यरत असलेल्या कर्मचा-यांवर अतिरिक्त ताण पडत आहे हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर रिक्त पदे तातडीने भरण्याबाबत तसेच पदे भरतांना कोकणाला प्राधान्य देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१५-१२-२०२२) :** (१) अशा आशयाचे निवेदन प्राप्त झाल्याचे आढळून येत नाही.
(२), (३) व (४) विकासकामांवर परिणाम होऊ नये या प्रयोजनास्तव महसूल विभाग वाटप नियम, २०२१ विहित करण्यात आले आहेत. त्याद्वारे राज्यातील सर्व महसूली विभागातील रिक्त पदे समप्रमाणात भरण्याबाबत निर्देश दिले आहेत.
सबब, महसूल विभाग वाटप नियमावलीमुळे कोणत्याही महसूली विभागातील पदे रिक्त राहण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबईतील पोईसर, कांदिवली व मरोळ येथील नदीपात्रांमध्ये कचरा टाकणाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत**

**(२३) ४५५१४ (१७-०९-२०२२). श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.अमित झनक (रिसोड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील पोईसर, कांदिवली व मरोळ येथील नदीपात्रांमध्ये मोठ्या प्रमाणात कचरा टाकल्यामुळे या नदीपात्रांना डंपिंग ग्राऊडचे स्वरुप आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अनेक कंत्राटदार देखील डेब्रिज नदीपात्रांमध्ये टाकत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधितांविरुध्द कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०८-१२-२०२२) :** (१) हे खरे नाही.
(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### लातूरच्या धर्तीवर राज्यातील प्रत्येक जिल्हयात ऑटिझम सेंटर आणि सेंसर पार्क उभारण्याबाबत

**(२४) ४५५७३ (२३-०९-२०२२). डॉ.राहूल पाटील (परभणी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात प्रत्येक जिल्ह्यात लातूरच्या धर्तीवर दिव्यांगासाठी ऑटिझम सेंटर आणि सेंसर पार्क उभारण्याची घोषणा सामाजिक न्याय मंत्री यांनी माहे मे, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रस्तावाच्या अनुषंगाने दिव्यांगासाठी ऑटिझम सेंटर आणि सेंसर पार्क उभारण्याबाबत व विवाहित दिव्यांग जोडप्याला ५० हजार रुपयांची मदत समाज कल्याण विभागामार्फत देण्याचा निर्णय सामाजिक न्याय मंत्री यांनी घेतलेला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रस्तावाची योग्यप्रकारे अंमलबजावणी होण्याच्यादृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०९-१२-२०२२) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) अंशत: खरे आहे.

अ) ऑटिझम सेंटर ऐवजी सर्व प्रकारच्या दिव्यांगांना सर्व प्रकारच्या सोई-सुविधा एकाच ठिकाणी देण्याच्या दृष्टीने प्रत्येक जिल्हयामध्ये एक "दिव्यांग भवन" उभारण्याची बाब विचाराधीन आहे.

ब) दिव्यांग विवाहीत जोडप्याला ५० हजार रुपयांची मदतीसाठी दि.१७ जून,२०१४ रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे.

(३) प्रत्येक जिल्हयामंध्ये दिव्यांग भवन उभारण्याबाबत उचित कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### शासकीय निवासी शाळांमध्ये सीबीएसई अभ्यासक्रम सुरु करण्याबाबत

**(२५) ४५७३५ (२३-०९-२०२२). श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सामाजिक न्याय विभागातर्फे संचालित शासकीय निवासी शाळांमधील विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण मिळावे म्हणून केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाचा (सीबीएसई) अभ्यासक्रम सुरू करण्याचे शासनाने माहे मार्च २०२१ मध्ये वा त्यादरम्यान जाहीर केले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाचा अभ्यासक्रम किती शासकीय निवासी शाळांमध्ये सुरु करण्यात आला आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१३-१२-२०२२) :** (१) होय.

(२) व (३) राज्यातील शासकीय निवासी शाळांमध्ये सी.बी.एस.ई.अभ्यासक्रम सुरू करण्याच्या अनुषंगाने आवश्यक बाबींची पुर्तता करून परिपुर्ण प्रस्ताव सादर करण्याबाबत आयुक्त, समाजकल्याण यांना सूचना देण्यात आलेल्या आहेत. याबाबतचा प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर पुढील कार्यवाही करण्यात येईल.

---

### राज्यात स्मार्ट सिटी योजनेतून सोलापूर महानगरपालिकेने इंदिरा गांधी पार्क स्टेडियम आंतरराष्ट्रीय दर्जाचे करण्याबाबत

**(२६) ४५७५८ (२७-०९-२०२२). श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात स्मार्ट सिटी योजनेतून सोलापूर महानगरपालिकेने इंदिरा गांधी पार्क स्टेडियम आंतरराष्ट्रीय दर्जाचे करण्यात

आले, परंतू एकदिवसीय सामन्यांसाठी नऊ हजार रुपये, तर पाच दिवसीय सामन्यांसाठी ३५ हजार रुपये आणि शनिवारी व रविवारी प्रत्येक सामन्यांसाठी १३ हजार रुपये भाडे आकारले जात असल्याने अद्याप या मैदानावर एक ही सामना झालेला नसल्याची बाब माहे मे, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, क्रिकेट असोसिएशन ना-नफा, ना-तोटा या तत्वावर खेळाडुंना घडवत असल्याने खेळाडूंकडून या मैदानाचे भाडे देणे शक्य नसल्याने मोफत देण्याची मागणी केली आहे हे ही खरे काय,
(३) असल्यास, या अनुषंगाने शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे काय,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१४-१२-२०२२) :** (१) होय, हे अंशत: खरे आहे, स्मार्ट सिटी अभियानांतर्गत सोलापूर शहरात आंतरराष्ट्रीय दर्जाच्या इंदिरा गांधी पार्क स्टेडियमची निर्मिती करण्यात आली आहे.
सोलापूर जिल्हा स्टेडियम कमिटी सभेमध्ये सदर स्टेडियमकरीता एक दिवसीय सामन्यासाठी रुपये ९ हजार, कमीतकमी ५ दिवसांच्या सामन्याकरीता प्रति दिवस रुपये ७ हजार, तर शनिवार व रविवार प्रत्येक सामन्यासाठी रुपये १३ हजार असे दर निश्चित करण्यात आले आहेत.
तसेच, सदर मैदानाचे उद्घाटनानंतर मागणी नुसार सदरचे मैदान स्पर्धेसाठी उपलब्ध करून देण्यात येणार आहे असे सोलापूर महानगरपालिकेने कळविले आहे.
(२) व (३) सोलापूर क्रिकेट असोसिएशनव्दारे ना-नफा ना-तोटा या तत्वावर खेळाडुंना घडवत असल्याने खेळाडूंकडून या मैदानाचे भाडे देणे शक्य नसल्याने सदर मैदान मोफत देण्याची मागणी करण्यात आली होती.
तथापि, सोलापूर जिल्हा स्टेडियम कमिटीच्या दिनांक ०७ जून, २०२२ रोजीच्या बैठकीच्या इतिवृत्तात सदर मैदान कोणासही विनामुल्य उपलब्ध करून देता येणार नाही असे नमूद आहे असे सोलापूर महानगरपालिकेने कळविले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**ठाणे महापालिकेचा टीएमटी अंतर्गत असलेल्या आधुनिक तंत्रज्ञान सुविधा देणाऱ्या प्रकल्पाबाबत**

**(२७) ४५८९९ (२५-०९-२०२२). श्री.संजय केळकर (ठाणे) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ठाणे शहरात सहा वर्षापूर्वी ठाणे महापालिकेचा टीएमटी अंतर्गत असलेला आधुनिक तंत्रज्ञान सुविधा देणारा तसेच पालिकेच्या स्मार्ट सिटीमध्ये असलेला (इंटेलिजंट ट्रान्सपोर्ट मॅनेजमेंट सिस्टम) प्रकल्प अखेर संपुष्टात आला असल्याची बाब माहे मे, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदशर्नास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकल्पात आतापर्यंत किती रुपयांची गुंतवणूक महानगरपालिकेने केली आहे तसेच सदर गुंतवणूक करण्यापूर्वी स्मार्ट सिटीच्या अधिकाऱ्यांनी प्रकल्पाचा कोणता कृती आराखडा तयार केला होता,
(३) असल्यास, या आराखड्यानुसार काम न करण्याऱ्यांवर शासनाने कडक कारवाई करून गुंतवणूक केलेली रक्कम परत करण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना वा कार्यवाही केली वा करण्यात येत आहे काय,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१४-१२-२०२२) :** (१) होय, हे खरे आहे.
तथापि, दिनांक ०१ एप्रिल, २०२२ पासुन सदर प्रकल्पाचा पुढील तीन वर्षाचा निगा व देखभालीचा कालावधी सुरु करण्यात आला आहे.
(२) ठाणे महानगरपालिका परिवहन सेवेच्या इंटेलिजंट ट्रान्सपोर्ट मॅनेजमेंट सिस्टीम (आयटीएस) या प्रकल्पामध्ये ठाणे महानगरपालिका परिवहन सेवेच्या बसेसवर जीपीएस यंत्रणा उभारणे, बस थांब्यावर येणाऱ्या बसच्या माहितीसाठी एलईडी डिस्प्ले लावणे, या यंत्रणेसाठी इंटीग्रेटेड कमांड सेंटर उभारणे, प्रवाशांच्या माहितीसाठी ॲप विकसित करणे आणि या सर्व बाबींचे तीन वर्षासाठी व्यवस्थापन, निगा देखभाल व परिचालन करणे या कामाचा समावेश करण्यात आला होता.

(३) ठाणे महानगरपालिकेच्यावतीने सदर प्रकल्पाकरिता निविदा मागवण्यात आली होती. सदर निविदा अंतिम झाल्यानंतर रुपये ४,०७,९०,४७०/- इतक्या रकमेचा कार्यादेश कंत्राटदारास देण्यात आला होता. यापैकी निविदा अटी व शर्तीनुसार आजमिती पर्यंत रुपये २,७१,७५,६८२/- इतकी रक्कम कंत्राटदारास अदा करण्यात आली आहे.

सदर प्रकरणी प्रकल्प अंमलबजावणी विलंब केल्याच्या कारणास्तव संबंधित ठेकेदाराविरुद्ध ठाणे महानगरपालिकेमार्फत दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सांताक्रुझ (मुंबई) येथील एमएमआरडीएच्या हद्दीतील डानी वूल्टेक्स नाल्याचे रुंदीकरण व खोलीकरण करण्याबाबत

**(२८) ४५९२२ (२८-०९-२०२२). श्री.संजय पोतनीस (कलिना) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांताक्रुझ (मुंबई) कलिना, सुंदर नगरमधील डानी वूल्टेक्स नाल्याचे रुंदीकरण व खोलीकरण करुन नाला पक्का बनविण्याकरीता स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक १६ एप्रिल, २०२२ रोजी वा त्यासुमारास पालकमंत्री मुंबई उपनगर जिल्हा तथा पर्यटन, पर्यावरण मंत्री महोदय व संबंधित मंत्री महोदय यांच्याकडे पत्रव्यवहार केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पत्राच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१८-१२-२०२२) :**(१), (२) व (३) होय. सांताक्रुझ (मुंबई), कलिना, सुंदर नगरमधील डानी वूल्टेक्स नाल्याचे रुंदीकरण व खोलीकरण करुन नाला पक्का बनविण्याकरीता वांद्रे-कुर्ला संकुलाच्या जी-टेक्स्ट ब्लॉकमधील सदर नाल्याचे downstream कडचे बांधकाम प्राधिकरणाने पूर्ण केले असून उर्वरीत upstream कडचे बांधकाम संबंधितांकडून prorata वसूली (recovery) होताच काम हाती घेण्याची कार्यवाही करण्यात येईल.

---

## नवी मुंबई येथील मोरबे धरणाचे काम पूर्ण झाल्यानंतर कल्याण-डोंबिवली शहराला पाणी पुरवठा करण्याबाबत

**(२९) ४६०३४ (२८-०९-२०२२). श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.विश्वनाथ भोईर (कल्याण पश्चिम), श्री.प्रमोद (राजू) रतन पाटील (कल्याण ग्रामीण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबई येथील मोरबे धरणाचे काम पूर्ण झाल्यानंतर १४० दशलक्ष लीटर पाणी कल्याण-डोंबिवली शहराला दिले जाईल असे स्पष्ट केलेले असताना व मोरबे धरण २००८ मध्ये पूर्ण होऊन आजमितीस मोरबे धरणाचे नवी मुंबई महानगरपालिकेत जाहिर केलेले १४० दशलक्ष लीटर पाणी देण्याचा प्रश्न आजही अनिर्णित असल्याने कल्याण-डोंबिवली शहरातील नागरिकांना भीषण पाणी टंचाईला सामोरे जावे लागत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, डोंबिवलीतील संदप येथील खदाणीत देसलेपाडा येथील गायकवाड कुटुंबातील पाच जणांचा दि. ७ मे, २०२२ रोजी बुडुन मृत्यू झाल्याची दुर्देवी घटना घडली असून गावांतील भीषण पाणी टंचाईची समस्या हेच या मृत्यूचे कारण असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच घुंगटाचापाडा, उंबर्डे (ता.कल्याण) येथील नागरिकांना पिण्याचे पाणी मिळत नसल्याचे बाब दिनांक १५ मे, २०२२ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय

(४) असल्यास, २००८ पासून कल्याण-डोंबिवली शहरातील पाणी टंचाई दूर करण्यासंदर्भात तसेच नवी मुंबईने जाहिर केलेले १४० दशलक्ष लीटर पाणी कल्याण-डोंबिवली शहरांना देण्याच्या घोषणेसंदर्भात यापूर्वी मा.नगरविकास मंत्री यांचेकडे सातत्याने बैठका होऊनही आजमितीस कोणताही निर्णय झालेला नाही, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, कल्याण-डोंबिवली मधील २७ गावांत गेल्या काही वर्षांत मोठी गृहसंकुले उभी राहत आहेत तसेच नागरीकरणही झपाटयाने होत असल्याने या गावांना विनाविलंब पुरेशा दाबाने नियमितपणे पाणी पुरवठा करण्याचे दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०७-१२-२०२२) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) कल्याण-डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रातील भोपर-देसलेपाडा महसूल हदीमध्ये मोठ्या प्रमाणात खदाणी आहेत.

• खदाणीतील पाण्याचा वापर कपडे धुणे व इतर कामासाठी केला जातो. या खदाणीतील पाण्याचा वापर निण्यासाठी केला जात नाही.

• दि.०६.०५.२०२२ रोजी देसलेपाडा येथील गायकवाड कुटुंबातील दोन महिला व ३ मुले खदाणीमध्ये कपडे धुण्यासाठी गेले असता, पोहण्यासाठी पाण्यात उतरल्याने ५ व्यक्तींचा बुडून मृत्यु झाला, ही वस्तुस्थिती आहे.

(३) घुंगटाचापाडा, उंबर्डे ता.कल्याण येथे एकूण २० ते २५ घरांची वस्ती आहे. सदर वस्तुपासून जलकुंभ दुरवर आहेत. या वस्तीतील उंचावर असलेल्या घरांना उन्हाळ्यामध्ये पिण्याच्या पाण्याचा कमी दाबाने पुरवठा होत असल्याने, मा. आमदार निधीतून कोळीवली जलकुंभापासून स्वतंत्र जलवाहिनी टाकून पाणी पुरवठा सुरळीत करण्यात आलेला आहे.

(४) व (५) कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या पाणी पुरवठा संदर्भात तत्कालीन मा.मंत्री (नगर विकास) यांचे अध्यक्षतेखाली दि. १३.०६.२०२२ रोजी बैठक आयोजित करण्यात आली होती.

• सदर बैठकीमध्ये कल्याण-डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रातील नेतिवली जलशुध्दीकरण केंद्रामध्ये २० द.ल.ली. शुध्दीकरण करणे व नवीन २०० HP पंप बसविणे. तसेच, २७ गावांकरीता महाराष्ट्र औद्योगिक महामंडळाने डोंबिवली फिडर, काटई नाका येथे पुरेसा पाण्याचा दाब देणेबाबत, तत्कालीन मा. मंत्री महोदयांनी सूचना दिलेल्या आहेत.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## ठाणे जिल्ह्यातील डोंबिवली एम.आय.डी.सी. येथील कोविड केंद्र उभारणीची चौकशी करण्याबाबत

**(३०) ४६१७३ (२८-०९-२०२२). श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्ह्यातील डोंबिवली एम.आय.डी.सी. येथील विमा मॅकनॉ इलेक्ट्रिक इंडिया या कंपनीच्या जागेवर ७ कोटी रुपये खर्च करून कोविड केंद्र उभारले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अवघ्या ५ महिन्यात हे कोवीड केंद्र प्रशासनाने बंद केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी प्रशासनाच्या चुकीमुळे करदात्यांच्या ७ कोटीचे नुकसान झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुषंगाने संबंधित प्रशासकीय अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०७-१२-२०२२) :** (१) होय, हे खरे आहे.

(२), (३) व (४) कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेमार्फत महापालिका क्षेत्रातील कोविड रूग्णांना उपचार होण्याच्या हेतूने विविध कोविड सेंटर्सची उभारणी करण्यात आली होती.

• सदर सेंटर्समध्ये कोरोनाच्या पहिल्या लाटेत एकूण ६७००३ रूग्णांवर व दुसऱ्या लाटेत १६२८९ रूग्णांवर मोफत उपचार करण्यात आलेले आहेत. यामध्ये महापालिकेमार्फत ४९१४ खाटा उपलब्ध करून देण्यात आल्या होत्या. त्यापैकी २०८ खाटा या आय.सी.यू. साठी उपलब्ध करून देण्यात आल्या होत्या.

• दि.३१.१२.२०२१ अखेर कोविडची तिसऱ्या लाटेमध्ये २४४३४ सक्रिय रूग्णांची नोंद झाली. यामध्ये ९००० खाटांची संभाव्य आवश्यकता भासणार होती.

• तिसऱ्या लाटे दरम्यान आवश्यक खाटांची ही अधिक असल्याने, नवीन सेंटर उभारणे गरजेचे होते.

• तिसऱ्या लाटे दरम्यान उपचार उपलब्ध होणेकरीता अतिरिक्त खाटा उपलब्ध करणेकामी महानगरपालिकेमार्फत विभा मॅकनो प्रा. लि. येथील जागेमध्ये एकूण ५४० खाटांचे रूग्णालय उभारण्यात आले होते. यामध्ये ऑक्सिजन ४० व आयसीयू मधील ४० खाटा ह्या बालकांकरीता राखीव ठेवण्यात आलेल्या होत्या.

• विभा मॅकनो प्रा. लि. या कंपनीच्या इमारतीमध्ये आय.सी.यू. व ऑक्सिजन बेडच्या सोईनी युक्त डेडीकेटेड कोविड रूग्णालय उभारणेकामी महानगरपालिकेमार्फत व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, मुंबई

यांचेकडे रू.६.०० कोटी अनुदानाची मागणी करण्यात आली होती. सदर रक्कम महानगरपालिकेच्या फंडात दि.०३.०५.२०२१ रोजी आर.टी.जी.एस.द्वारे जमा झालेली आहे.

• कल्याण-डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रात तिसऱ्या लाटेचा प्रादुर्भाव दिसून आला होता. त्यात दैनंदिन सक्रिय रूग्णसंख्या जास्तीत जास्त ११४८३ पर्यंत पोहोचली होती. परंतू, यादरम्यान रूग्णांना दाखल करण्याचे प्रमाण कमी असल्याने, नवीन कोविड सेंटरची गरज भासली नाही.

• सदर खर्च हा नागरिकांच्या आरोग्यासाठी शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनूसार करण्यात आला असल्याचे, कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेने कळविले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**शहापूर ते सापंगाव (जि.ठाणे) या दरम्यान कॉंक्रिटीकरणाचे काम निकृष्ट दर्जाचे असल्याबाबत**

**(३१) ४६१९२ (२५-०९-२०२२). श्री.दौलत दरोडा (शहापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शहापूर ते सापंगाव (जि.ठाणे) या दरम्यान कॉंक्रिटीकरणाचे अत्यंत निकृष्ट दर्जाचे काम सुरु असून या बाबत संबधित ठेकेदारांची चौकशी करण्यासंदर्भात तेथील नागरिकांनी दिनांक ४ मे, २०२२ रोजी रास्ता रोको आंदोलन केले होते हे खरे आहे काय,

(२) असल्यास याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, उक्त निकृष्ट कामाच्या चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने शासनाने संबंधित ठेकेदारांविरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०६-०१-२०२३) :** (१) हे खरे नाही.

शहापूर ते सापगाव या एकूण २.४९० कि.मी. लांबीच्या महामार्गाचे काँक्रिटीकरण करण्याबाबत श्री.नयन विठ्ठल फर्डे उपसभापती, प. सं. शहापूर यांनी त्याचे दि.२७/०४/२०२२ च्या पत्रान्वये कळविले होते. या कार्यालयाचे सदरच्या लांबीमधील निविदेच्या वावानुसार १५/०५/२०२२ पर्यंत काम पूर्ण करण्याचे दि. ०२/०५/२०२२ रोजी लेखी आश्वासन दिले होते. त्यानुसार श्री.नयन विठ्ठल फर्डे यांनी नियोजित रस्ता रोको आंदोलन स्थगित केले होते.

शहापूर ते सापगाव या लांबीत अस्तित्वातील रस्त्याचे १.२४ कि.मी. लांबीत काँक्रिटीकरणाचा समावेश आहे. त्यापैकी १.०५० कि.मी. लांबीत काँक्रिटीकरण पूर्ण केले असून रस्ता सुस्थितीत आहे. या लांबीपैकी ०.१९ कि.मी. लांबीत अस्तित्वात असलेल्या रस्त्याच्या जमिनीचा मोबदला करिता स्थानिक शेतकऱ्यांनी कामात अडवणूक केल्याने काम करता आले नाही.

(२) श्री. नयन विठ्ठल फर्डे यांनी नियोजित केलेले दि. ०४/०५/२०२२ रोजीचे रस्ता रोको आंदोलन हे शहापूर-सापगाव रस्त्याचे काम पूर्ण करण्यासाठी केले होते. यामध्ये निकृष्ट कामाबाबत उल्लेख नाही. त्यामुळे कंत्राटदाराची निकृष्ट कामाबाबत चौकशीचा प्रश्न उद्भवत नाही. या भागात करण्यात आलेले काँक्रिटीकरणाचे काम सुस्थितीत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कल्याण (जि.ठाणे) महानगरपालिका हद्दीत अत्याधुनिक रुग्णालयासाठी भूखंड हस्तांतरित करण्याबाबत**

**(३२) ४६७५१ (२५-०९-२०२२). श्री.विश्वनाथ भोईर (कल्याण पश्चिम), श्री.शांताराम मोरे (भिवंडी ग्रामीण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण (जि.ठाणे) महानगरपालिका हद्दीत अत्याधुनिक रुग्णालयासाठी शासनाने भूखंड हस्तांतरित करण्याचा निर्णय घेतला असल्याची बाब दिनांक २४ मे, २०२२ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास १८ लाख लोकसंख्या असलेल्या ठाणे जिल्ह्यातील कल्याण येथे अत्याधुनिक रुग्णालय अथवा सुपर स्पेशालिटी रुग्णालय व्हावे अशी सततची मागणी करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्यानुषगांने कल्याण येथे अत्याधुनिक अथवा सुपर स्पेशालिटी रुग्णालय मंजूर करून त्यासाठी आवश्यक भूखंड वितरीत करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०७-१२-२०२२) :** (१) हे खरे नाही.
(२) अशा आशयाची मागणी निवेदनामार्फत सन्माननीय विधानसभा सदस्यांकडून होत आहे, हे खरे आहे.
(३) कल्याण-डोंबिवली महानगरपालिका हद्दीत सद्यस्थितीत बाई रूक्मिणीबाई रूग्णालय, कल्याण (प.) व शास्त्रीनगर सामान्य रूग्णालय, डोंबिवली (प.) ही प्रत्येकी १२० बेड क्षमतेची दोन मोठी रूग्णालये, एक प्रसुतीगृह रूग्णालय, चार लहान व १८ नागरी आरोग्य केंद्र कार्यरत आहेत.
• नागरिकांच्या भविष्यातील आरोग्य विषयक गरजा लक्षात घेऊन कल्याण-डोंबिवली महानगरपालिका कार्यक्षेत्रात हॉस्पिटल करीता आरक्षित असलेल्या जागेवर पी.पी.पी. तत्त्वावर नवीन हॉस्पिटल उभारणेकरीता महापालिकेच्या सर्वसाधारण सभेने दि.०६.११.२०२० रोजी ठराव क्र. १३ अन्वये मंजूरी दिली आहे.
• महानगरपालिकेच्या नगररचना विभागाने हॉस्पिटलसाठी आरक्षित असलेल्या काही जागा कळविल्या आहेत. मात्र आवश्यक असे क्षेत्रफळ असलेल्या जागेचा ताबा महापालिकेकडे नसल्याने, त्यांचा विचार करणे सद्यस्थितीत शक्य होत नाही.
• त्यामुळे कल्याण-डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रात सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल उभारण्यासाठी सुयोग्य जागेची निवड करून आवश्यक ते धोरण निश्चित करण्याची बाब महानगरपालिका स्तरावर सुरू असल्याचे, महानगरपालिकेने कळविले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कल्याण-डोंबिवली (जि.ठाणे) महानगरपालिका अंतर्गत स्वच्छतागृहाचा अभाव असल्याने नागरिकांची होत असलेली गैरसोय

**(३३) ४६७५३ (२५-०९-२०२२). श्री.विश्वनाथ भोईर (कल्याण पश्चिम), श्री.शांताराम मोरे (भिवंडी ग्रामीण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कल्याण-डोंबिवली (जि.ठाणे) शहराची लोकसंख्या १८ लाख इतकी असून येथील बाजारपेठ व मुख्य रस्ते येथे स्वच्छतागृहाचा अभाव असल्याने नागरिकांची विशेषता वृद्ध रुग्णांची प्रचंड गैरसोय होत असल्याची बाब दिनांक १ मे, २०२२ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे,
(३) असल्यास, चौकशीत काय निष्पन्न झाले व त्यानुषंगाने कल्याण शहरामध्ये मुख्य बाजारपेठ मुख्य रस्ते मुख्य चौक लगत स्वच्छतागृहाचे बांधकाम करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०७-१२-२०२२) :** (१),(२) व (३) कल्याण-डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रात बाजारपेठ, मुख्य रस्ते व सार्वजनिक गर्दीच्या ठिकाणी एकूण ५२ स्वच्छतागृह कार्यरत आहेत.
• सदर स्वच्छतागृहांची दैनंदिन स्वच्छता परिचालन सेवाभावी संस्था व महानगरपालिकेच्या कर्मचाऱ्यांमार्फत करण्यात येते.
• वाढत्या नागरीकरणामुळे नव्याने निर्माण झालेल्या सार्वजनिक गर्दीच्या ठिकाणी स्वच्छता गृहे बांधण्यासाठी जागेच्या उपलब्धतेबाबत सर्वेक्षण करून, उपलब्ध होणाऱ्या जागेनुसार व उपलब्ध निधीनुसार स्वच्छतागृहे बांधण्याचे काम महानगरपालिका स्तरावर सुरू असल्याचे, कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेने कळविले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात बंदी असलेल्या सिंगल युज प्लॅस्टीकचे उत्पादन सुरु असल्याबाबत

**(३४) ४६९१३ (१७-०९-२०२२). श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सिंगल युज प्लॅस्टीक निमिर्तीच्या वापरावर कायदेशीर बंदी असून राज्यात सन २०२२ मध्ये ४ लाख ६९ टन प्लॅस्टीक वेस्ट तयार करण्यात आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात सन २०२१ मधे सुमारे ३ लाख ११ हजार टन सिंगल युज प्लॅस्टीकची निमिर्ती करण्यात आली असतांना महाराष्ट्र प्रदुषण नियमक मंडळाने फक्त १४२५ टन प्लॅस्टीक जप्तीची कारवाई केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यात प्लॅस्टीक वेस्ट मॅनेजर ॲक्ट २०१८ नुसार शासनाचे पर्यावरण विभागाकडे प्लॅस्टीक कॅरी बॅग व थर्माकोलचे गैर उत्पादन, विक्री व हाताळणी अंतर्गत किती गुन्ह्यांची नोंद करुन कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१९-१२-२०२२) :** (१) हे अंशत: खरे आहे. तथापि नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेतर्फे सादर करण्यात आलेल्या वार्षिक अहवालानुसार राज्यात सन २०२१-२०२२ मध्ये ३ लाख ५६६३ टन प्लास्टिक कचरा निर्माण झाला होता त्यापैकी ३०५०५९ टन प्लास्टिक कचरा गोळा करण्यात आला असून २४६५३३ टन प्लास्टिक कचऱ्याची विल्हेवाट लावण्यात आली आहे.

(२) सन २०२१ मध्ये सुमारे ०३ लाख ११ हजार टन सिंगल युज प्लास्टिकची निर्मिती करण्यात आली हे खरे नाही. तथापि नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेतर्फे सादर करण्यात आलेल्या वार्षिक अहवालानुसार राज्यात सन २०२० - २०२१ मध्ये ०३ लाख ११ हजार टन प्लास्टिक कचरा निर्माण झाला होता. नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेतर्फे सादर करण्यात आलेल्या वार्षिक अहवालानुसार राज्यात सन २०१८ पासून सन २०२१ पर्यंत नागरी स्थानिक स्वराज्य संस्था व महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळातर्फे १२१०.९१४ टन प्लास्टिक जप्तीची कारवाई करण्यात आली आहे.

(३) महाराष्ट्र प्लास्टिक व थर्माकॉल अविघटनशिल वस्तूंचे (उत्पादन, वापर, विक्री, वाहतूक, हाताळणी, साठवणूक) अधिसूचना २०१८ नुसार सन २०१८ पासून सन २०२१ पर्यंत प्लास्टिक कॅरी बॅग व थर्माकॉलचे गैर उत्पादन, विक्री व हाताळणी अंतर्गत ३८१९९ विक्रीकर्त्या वर कारवाई करण्यात आली असून रु १०.४५/- कोटी दंड वसूल करण्यात आला आहे. तसेच ४०५ उत्पादक उद्योगावर कारवाई करण्यात आली असून रु. ४,१५,०००/- एवढा दंड वसूल करण्यात आला आहे व २३८.६७ टन प्लास्टिक जप्त करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## महाराष्ट्रातील सर्व तालुक्यातील तहसिल कार्यालयात सेतू सुविधा केंद्रामध्ये काम करणाऱ्या कंत्राटी कर्मचाऱ्यांना किमान वेतन मिळत मिळण्याबाबत

**(३५) ४७००२ (०१-११-२०२२). श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्रातील सर्व तालुक्यातील तहसिल कार्यालयात सेतू सुविधा केंद्रामध्ये काम करणाऱ्या कंत्राटी कर्मचाऱ्यांना किमान वेतन मिळत नसल्याचे माहे मे, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कंत्राटी कर्मचाऱ्यांना किमान वेतन न मिळण्याची कारणे काय आहेत तसेच याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास ,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२१-१२-२०२२) :** (१) व (२) विभागाच्या शासन निर्णय क्र.सीओएम१००२/प्र.क्र.२४०/३९, दि.२३.०८.२०२२ अन्वये जिल्हा तथा तालुका स्तरावर सेतू सुविधा केंद्र सुरु करण्याबाबत मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत. त्यानुसार राज्यातील विविध जिल्ह्यांमध्ये संबंधित जिल्हा सेतू समितींमार्फत तहसिल स्तरावरील सेतू सुविधा केंद्रे निविदा प्रक्रिया राबवून करार पद्धतीने खाजगी कंत्राटदारास चालविण्यास देण्यात आलेले आहेत. या सेतू सुविधा केंद्रांमध्ये नेमण्यात येणारा कंत्राटी कर्मचारी वर्ग निवड झालेल्या कंत्राटदारामार्फत नेमण्यात येतो. सदर कर्मचाऱ्यांचे व्यवस्थापन व नियंत्रण तसेच त्यांचे वेतन/मानधन सदर कंत्राटदारामार्फत करण्यात येते. त्या अनुषंगाने विभागामार्फत राज्यातील सर्व जिल्हा सेतू समितींना तसेच कामगार विभागास सेतू केंद्रांतील कंत्राटी कर्मचाऱ्यांना किमान वेतन कायदा, १९४८ अनुषंगिक अधिसूचनांप्रमाणे किमान वेतन मिळण्याबाबत त्यांचे स्तरावरुन आवश्यक कार्यवाही करण्याबाबत विभागाच्या दि.२९ नोव्हेंबर, २०२२ रोजीच्या पत्रान्वये निर्देशित करण्यात आले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### चंद्रपूर शहर महानगरपालिके अंतर्गत सुरु असलेल्या अमृत योजना अद्यापही अपूर्णावस्थेत असल्याबाबत

**(३६) ४७००६ (१०-११-२०२२). श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चंद्रपूर (जि.चंद्रपूर) शहर महानगरपालिके अंतर्गत सुरु असलेली अमृत योजना अद्यापही पूर्ण झाली नसल्याचे माहे जून, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वरील योजना पुर्णत्वास नेण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१४-१२-२०२२) :** (१) अंशतः खरे आहे.
(२) केंद्र पुरस्कृत अमृत अभियानांतर्गत चंद्रपूर शहराच्या पाणी पुरवठा व सांडपाणी पुनर्चक्रीकरण व पुनर्वापर प्रकल्पास प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्यात आलेली आहे.

सदर प्रकल्पांपैकी पाणी पुरवठा प्रकल्पाची बहुतांश कामे पूर्ण झालेली असून प्रकल्पाची भौतिक प्रगती ९५ टक्के झालेली आहे. प्रकल्प कार्यान्वित करण्याच्या दृष्टीने झोन निहाय कामे पूर्ण करून चाचणी घेण्यात येत आहे. त्यानुसार, शहरातील १६ पैकी ९ झोनचा पाणी पुरवठा सुरु करण्यात आला आहे. तसेच, उर्वरित झोनची चाचणी प्रगतीपथावर आहे व लवकरच पूर्ण करण्याचे चंद्रपूर महानगरपालिकेचे नियोजन आहे.

चंद्रपूर शहराच्या सांडपाणी पुनर्चक्रीकरण व पुनर्वापर प्रकल्पाचे कार्यादेश सन २०२१ मध्ये देण्यात आले असून आजतागायत प्रकल्पाची भौतिक प्रगती ८० टक्के झालेली असून सदर प्रकल्प माहे मार्च, २०२३ पर्यंत पूर्ण करून कार्यान्वित करण्याचे नियोजन आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडे महानगरपालिकेच्या मालमत्ता कराची मोठया प्रमाणात थकबाकी असल्याबाबत

**(३७) ४७०७७ (३०-१०-२०२२). श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने (एमएमआरडीए) मुंबई महानगरपालिकेला गेल्या २० वर्षापासून मालमत्ता कर न भरल्यामुळे रुपये २८४ कोटीवरुन ही रक्कम ६४५ कोटी रुपये इतकी थकबाकी झाली असल्याचे दिनांक २९ मार्च, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, एमएमआरडीएने राबविलेल्या प्रकल्पाअंतर्गत मेट्रो प्रकल्पासाठी कास्टींग यार्ड, मोनो मार्गिकेची स्थानके आणि डेपो इ. मालमत्ता मुंबई महानगरपालिकेच्या एफ-उत्तर विभागाअंतर्गत येत असल्याचेही त्याचसुमारास निदर्शनास आले आहे, हेही खरे आहे काय,
(३) असल्यास, मुंबई महानगरपालिका अधिकाऱ्यांनी माहे मार्च, २०२२ अखेरीस मालमत्ता कराची थकबाकी रक्कम मिळावी म्हणून एमएमआरडीएच्या अधिकाऱ्यांशी आतापर्यंत वेळोवेळी संपर्क साधूनही प्राधिकरणाकडून महापालिका प्रशासनास प्रतिसाद दिला जात नसल्याचेही निदर्शनास आले आहे, हेही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१८-१२-२०२२) :** (१) (२) व (३) होय, हे खरे आहे,

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडून मोनो रेल व मेट्रो रेल्वे प्रकल्पासाठी मालमत्ता कराकरीता सदरहू प्रकल्प हे भारतीय रेल्वे प्रकल्पाशी समकक्ष असल्याने भारतीय रेल्वेच्या मालमत्तांना ज्याप्रमाणे कराची आकारणी करण्यात येते त्याप्रमाणे सवलतीच्या दरात कर आकारणी करण्याबाबत बृहन्मुंबई महानगरपालिकेला विनंती करण्यात आली आहे.

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडून १३४१७ सदनिका बृहन्मुंबई महानगरपालिकेस हस्तांतरीत करण्यात आल्या असून, सदर प्रत्येक सदनिकेपोटी रु. ३ लाख प्रमाणे (रु.४०२.५१कोटी) तसेच महानगरपालिकेची जबाबदारी असताना एमएमआरडीए मार्फत कोविड-१९ करीता उभारलेल्या जंम्बो कोविड सेंटरच्या खर्चाचे म्हणजे सर्वसाधारणपणे रु.५४ कोटी असे एकूण ४५६.५१ कोटी इतक्या बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून एमएमआरडीएला देय असलेल्या रकमेचे समायोजन करण्याबाबत विनंती करण्यात आली आहे.

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने मोनो रेल, मेट्रो प्रकल्पांसाठी व तात्पुरत्या स्वरुपात वितरण केलेल्या जमिनीबाबतच्या मालमत्ता कराचा भरणा न केल्यामुळे महानगरपालिका अधिनियमानुसार मालमत्तेची जप्तीची कार्यवाही करु नये,अशीही विनंती करण्यात आली आहे.
(४) व (५) दिनांक ०२ ऑगस्ट, २०१७ रोजीच्या शासन आदेशानुसार मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणा कडून नियमित स्वरुपात मालमत्ता कराचा ५० % दराने भरणा करण्यात आला आहे. तथापि, एमएमआरडीएकडून मालमत्ता करात सवलत मिळण्याबाबत बृहन्मुंबई महानगरपालिकेस विनंती करण्यात आली आहे. बृहन्मुंबई महानगरपालिकेने सदर प्रस्ताव शासनाकडे पाठविला आहे. मालमत्ता करात सवलत देण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

---

## महाड (जि.रायगड) औद्योगिक वसाहतीच्या नदीपात्रात कोरोना चाचणीसाठी वापरलेले कीट आढळून आल्याबाबत

**(३८) ४७२७७ (१७-०९-२०२२). श्री.राजेंद्र पाटणी (कारंजा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाड (जि.रायगड) येथील औद्योगिक वसाहतीतील नदीपात्रात कोरोना चाचणीसाठी वापरलेले कीट माहे जून, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान आढळून आले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर कोरोना कीट्स आढळून आल्याने नागरीकांमध्ये भितीचे वातावरण निर्माण झाले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर कारवाई करण्याची मागणी स्थानिक नागरीकांकडून करण्यात येते आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधीत दोषींविरुद्ध कोणती कारवाई केली वा येत करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे (०२-०१-२०२३) :** (१) याबाबतची बातमी समाज माध्यमाव्दारे महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळास प्राप्त झाली होती.
(२) हे खरे नाही.
(३) व (४) त्यानुषंगाने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून करण्यात आलेल्या पाहणी दरम्यान महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, लोटे परशुरामच्या मुख्य रस्त्यालगत टेमघर ओढयाच्या कडेला अज्ञात व्यक्तीने कोरोना चाचणीमध्ये वापरलेल्या कीट इत्यादींचा कचरा टाकल्याचे निदर्शनास आले होते. सदर कचरा सांडपाणी सुविधा प्रक्रिया केंद्र, महाड यांच्यामार्फत उचलून त्याची विल्हेवाट महाराष्ट्र जैव प्रक्रिया केंद्र, लोटे परशुराम, ता.खेड यांच्याकडून शास्त्रोक्त पध्दतीने लावण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**रायगड जिल्ह्यातील न्हावे, गव्हाण, घारापुरी हद्दीतील मच्छिमार बांधवांचे तातडीने पुनर्वसन तसेच प्रकल्पबाधित ग्रामपंचायतींना पायाभूत सुविधा मिळण्याबाबत**

**(३९) ४७३८९ (२५-०९-२०२२). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.महेश बालदी (उरण), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रायगड जिल्ह्यातील न्हावा-शिवडी सागरी सेतू प्रकल्पाच्या बांधकामामुळे न्हावे, गव्हाण, घारापुरी हद्दीतील मच्छिमाराचे तातडीने पुनर्वसन तसेच प्रकल्पबाधित ग्रामपंचायतींना पायाभूत सुविधा मिळण्याकरिता निधी उपलब्ध करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे मे, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान आयुक्त, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, समुद्रातील सुमारे १६ किमी. लांबीच्या बांधकामामुळे पुलाच्या दोन्ही बाजुकडील अंदाजे ७५० मी. अंतरापर्यतच्या मासेमारी व्यवसायावर परिणाम होणार असल्याने बाधीत होणाऱ्या मच्छिमारी व्यावसायिकांना नुकसान भरपाई देण्याचे धोरण ठरविण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, प्रकल्प बाधित मच्छिमारांकडून मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडे अर्ज सादर करण्याची अंतिम दिनांक २० नोव्हेंबर, २०१९ ही ठरविण्यात आली होती, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, गव्हाण ग्रुप ग्रामपंचायत यांचा ठराव व सुधारीत यादी दिनांक ३ नोव्हेंबर, २०२१ रोजी प्राप्त झाली असून, उर्वरित न्हावा ग्रामपंचायत यांचा ठराव व सुधारीत यादी प्राप्त झाल्यानंतर दोन्ही ग्रामपंचायतीची अद्ययावत यादी मच्छिमार पात्रता पडताळणी समिती (FEVC) समोर पुढील कार्यवाहीकरीता सादर करण्यात आली आहे काय,
(५) असल्यास, त्यानुषंगाने प्रकल्पबाधित न्हावे, गव्हाण, घारापुरी हद्दीतील मच्छिमार बांधवांच्या पुनर्वसनाबाबत तसेच प्रकल्पबाधित ग्रामपंचायतींना पायाभूत सुविधा मिळण्याकरिता निधी उपलब्ध करण्याबाबत कोणती ठोस उपाययोजना व कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१७-१२-२०२२) :** (१), (२), (३) व (४) होय, हे खरे आहे.
(५) व (६) सदर प्रकरणी मच्छिमार पात्रता पडताळणी समिती समोर दिनांक २४.०१.२०२२ रोजी न्हावा ग्रामपंचायत व गव्हाण ग्रामपंचायत यांनी सादर केलेल्या सुधारीत यादीप्रमाणे प्रकल्पबाधित मच्छिमारा बांधवाना नुकसान भरपाई मिळण्याकरीता ग्रामपंचायतीकडून सदर व्यक्ती मासेमार करीत असल्याचे उचित दाखले / पुरावा मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडे जमा करणे आवश्यक आहे. तथापि, असे पुरावे सादर करण्यात आलेले नाही.

मौजे गव्हाण, कोपर, शिवाजीनगर, शेलघर, बेलपाडा आणि न्हावा ग्रामपंचायतीकरीता रु. ५ कोटी इतक्या रकमेचे कामे करण्याचे प्राधिकरणाने निश्चित केले असून त्यानुसार आवश्यक प्रस्ताव प्राधिकरणास प्राप्त झालेले नाही. प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर प्राधिकरणाच्या प्रचलित धोरणानुसार निधी उपलब्ध करुन देण्यात येईल.

---

## राज्य शासनाने मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या अनुदानित वसतिगृहांचे क्षेत्रफळ वाढविण्याचा घेतलेल्या निर्णयाबाबत

**(४०) ४७८३० (०६-१०-२०२२).श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील मागासवर्गीय समाजातील विद्यार्थ्यांसाठी चालविण्यात येणाऱ्या अनेक अनुदानित वसतिगृहांसाठी भाड्यापोटी देण्यात येणारे अनुदान थकीत असतानाही वसतिगृह इमारतीच्या अस्तित्वात असलेल्या किमान एक हजार चौरस फुटाची अट चार हजार चौरस फुट वाढविण्यात आल्याने वसतीगृह चालकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होत असल्याचे दि.२९ मार्च, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर वाढीव इमारत क्षेत्रफळ अटीची पूर्तता न करणाऱ्या वसतिगृहांची मान्यता रद्द करण्यास सुरुवात झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वसतिगृहांच्या भाड्यापोटी थकित असलेले अनुदान सत्वर अदा करणेबाबत तसेच वाढीव इमारत क्षेत्रफळाची जाचक अट रद्द करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१६-१२-२०२२) :** (१) अंशत: खरे आहे.

शासन निर्णय, दिनांक ०९ डिसेंबर, २०१९ अन्वये स्वयंसेवी संस्था संचलित अनुदानित वसतिगृह इमारत भाडे धोरण निश्चित करण्यात आलेले आहे.

(२) नाही.

(३) वसतिगृहाच्या इमारतीचे भाडे अदा करण्याबाबत नियमानुसार कार्यवाही करण्यात येत आहे. तसेच, आवश्यक सोयी-सुविधा उपलब्ध करण्यासाठी मुदतवाढ देण्याबाबत अनुदानित वसतिगृह संचालकांनी सादर केलेल्या निवेदनाच्या अनुषंगाने सदर शासन निर्णयाची अमंलबजावणी करण्यास जून, २०२३ पर्यंत मुदतवाढ देण्याचे निर्देश देण्यात आलेले आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## ठाणे जिल्ह्यातील अंबरनाथ पाणी पुरवठा योजना अमृत टप्पा – १ मधील शिल्लक रक्कमेतून उर्वरित कामांच्या प्रस्तावांना मंजुरी मिळणेबाबत

**(४१) ४८०९० (२८-०९-२०२२). डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्ह्यातील अंबरनाथ पाणी पुरवठा योजना अमृत टप्पा – १ मधील शिल्लक रक्कमेतून उर्वरित कामांच्या प्रस्तावांना मंजुरी देण्यात यावी अशी लेखी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधीनी पाणीपुरवठा मंत्री यांच्याकडे दि.१० मार्च, २०२२ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या उपाय योजनेसाठी बरेज येथे एक २० द.ल.लि. क्षमतेचे जलशुद्धीकरण केंद्र उभारून त्यासाठी आवश्यक पंपिंग मशिनरी व त्यानुषंगाने इतर यंत्रणा सामुग्री उभी करण्यात आल्यास अंबरनाथ शहरास १० द.ल.लि इतके पाणी उपलब्ध होणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१४-१२-२०२२) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) अमृत टप्पा-१ अंतर्गत अंबरनाथ व बदलापूर पाणी पुरवठा योजनेंतर्गत बॅरेज येथे १५ द.ल.ली. क्षमतेचे जलशुद्धीकरण केंद्र, आवश्यक पंपिंग मशिनरी व अनुषंगिक कामे करण्याचे प्रस्तावित आहे. या जलशुद्धीकरणाच्या

उभारणी व कार्यान्वयानंतर अंबरनाथ शहरास ७.५० द.ल.ली. इतके अतिरिक्त पाणी मिळेल असे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने कळविले आहे.
(३) महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने सदर कामाचे अंदाजपत्रक तयार करुन अमृत टप्पा-१ अंतर्गत अंबरनाथ व बदलापूर पूरक पाणीपुरवठा योजनेमधुन यासाठी होणारा खर्च प्रस्तावित केला होता. तथापि, दिनांक १२ ऑक्टोबर, २०२२ रोजी मा. मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांचे दालनात झालेल्या बैठकीत निर्देशानुसार सदर कामाचा खर्च महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने स्वनिधीतून करण्याचे निर्देश दिले आहेत. सदर निर्देशास अनुसरून सदर कामाच्या निविदा मागविण्यात आल्याचे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने कळविले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## बीड जिल्ह्यात महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान महाभियान अंतर्गत पाणी पुरवठा योजनेचे काम निकृष्ट दर्जाचे होत असल्याबाबत

**(४२) ४८१०२ (२८-०९-२०२२). श्री.प्रकाश (दादा) सुंदरराव सोळंके (माजलगांव) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बीड जिल्ह्यात महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान महाभियान अंतर्गत पाणी पुरवठा योजनेचे काम निकृष्ठ दर्जाचे होत असल्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक २९ मे, २०२१ रोजीच्या पत्रान्वये जिल्हाधिकारी बीड यांच्याकडे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, जिल्हाधिकारी, बीड यांनी दिनांक ३१ मे, २०२१ रोजीच्या पत्रान्वये मुख्याधिकारी नगरपंचायत, वडवणी जि.बीड यांना चौकशी करून अहवाल देण्याबाबत कळविण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी प्राप्त अहवालानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची काय कारणे आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१४-१२-२०२२) :** (१) होय हे खरे आहे.
महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियानांतर्गत मंजूर वडवणी शहर पाणीपुरवठा प्रकल्पाच्या कामाच्या अनुषंगाने स्थानिक लोकप्रतिनिधीनी दिनांक १२ मार्च, २०२१ रोजी तत्कालीन मा. मंत्री, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य तथा पालकमंत्री बीड यांना दिलेले निवेदन पुढील कार्यावाहीस्तव जिल्हाधिकारी कार्यालयास प्राप्त झाले होते.
(२) व (३) सदर निवेदनास अनुसरून जिल्हाधिकारी कार्यालय, बीड मार्फत सदर विषयाच्या अनुषंगाने मुख्याधिकारी, वडवणी नगरपंचायत यांच्याकडून चौकशी करून अहवाल सादर करण्याबाबत सूचित करण्यात आले होते.
सदर अहवालानुसार वडवणी शहर पाणी पुरवठा योजनेच्या कामाच्या दर्जाबाबत त्रयस्थ लेखापरीक्षण करण्यात आलेले असून प्रकल्पाचे काम नियमानुसार योग्य असल्याबाबत अहवालात अभिप्राय दिले आहेत.
सबब वडवणी पाणीपुरवठा प्रकल्पाचे काम निकृष्ठ दर्जाचे झाले नसल्याचे जिल्हाधिकारी, बीड यांनी कळविले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## औरंगाबाद शहरातील पाणी पुरवठयाबाबत

**(४३) ४८१६१ (२८-०९-२०२२). श्री.उदयसिंग राजपुत (कन्नड), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) औरंगाबाद शहराचा पाणी पुरवठयाबाबत मा.मुख्यमंत्री महोदयांनी दिनांक १८ जून, २०२२ रोजी वा त्यासुमारास पालकमंत्री, जिल्हाधिकारी व इतर अधिकाऱ्यांबरोबर बैठकीत आढावा घेतला आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर बैठकीत कोणकोणते निर्णय घेण्यात आले,
(३) असल्यास, सदर निर्णयानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१४-१२-२०२२) :** (१) होय, हे खरे आहे.

तत्कालीन मा. मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली दिनांक १७ जून, २०२२ रोजी औरंगाबाद शहर पाणीपुरवठा प्रकल्पाच्या अनुषंगाने बैठक आयोजित करण्यात आली होती.

(२) व (३) सदर बैठकीत औरंगाबाद शहरात सुरळीत पाणीपुरवठा करण्याच्या दृष्टीने आवश्यक उपाययोजना करण्याच्या, सदर प्रकल्पाच्या आढावा बैठकीत सदर प्रकल्पाच्या कंत्राटदारास निमंत्रित करण्याच्या, प्रकल्पासाठी आवश्यक परवानग्या विहित वेळेत घेण्याच्या, प्रकल्पाचे काम विहित मुदतीत पूर्ण करण्याच्या अनुषंगाने सदर बैठकीत चर्चा झाली.

त्यानुषंगाने संबंधिताना आवश्यक कार्यवाही करण्याच्या सूचना शासनामार्फत देण्यात आलेल्या आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कल्याण-डोंबिवली (जि.ठाणे) महापालिका हद्दीतील “अ” प्रभाग क्षेत्रात रहिवाशी अवैध बांधकाम होत असल्याबाबत

**(४४) ४८८१६ (२८-०९-२०२२). श्री.विश्वनाथ भोईर (कल्याण पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण-डोंबिवली (जि.ठाणे) महापालिका हद्दीतील “अ” प्रभाग क्षेत्रात मोठ्या प्रमाणात रहिवाशी अवैध बांधकाम होत असल्याची बाब दिनांक १ जून, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय

(२) असल्यास, कल्याण तालुक्यातील आंबिवली, शहाड, टिटवाळा येथे सुरु असलेल्या व झालेल्या अवैध रहिवाशी बांधकामामुळे अनेक नागरिकांची फसवणूक झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, स्थानिक “अ” प्रभाग क्षेत्र कार्यालयातील प्रशासनाच्या दुर्लक्ष व हलगर्जीपणामुळे सदर अवैध बांधकाम होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले व त्यानुषंगाने कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या “अ” प्रभाग क्षेत्रातील अवैध बांधकामाला प्रतिबंध घालण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१३-१२-२०२२) :** (१) हे खरे नाही.

(२), (३) व (४) कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या प्रभागक्षेत्र कार्यालयामार्फत अनधिकृत बांधकामांविरूध्द विहीत केलेल्या कार्यप्रणालीनुसार (S.O.P.) निरंतर कार्यवाही करण्यात येते.

• कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या १० प्रभागक्षेत्रात “प्रभागक्षेत्र अधिकारी तथा पदनिर्देशित अधिकारी” अनधिकृत बांधकामाविरूध्द महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २६० व २६७(१) अन्वये नोटीस काढून बांधकाम धारकास “अधिकृतता” दर्शविणारे कागदपत्र सादर करणेबाबत सुनावणी आयोजित करतात.

• सदरचे बाधंकाम अनधिकृत असल्यास बांधकाम धारकास स्वखर्चाने सदर बांधकाम काढून टाकण्याची सूचना दिली जाते.

• सदरचे बांधकाम बांधकामधारकाने मुदतीत काढून न घेतल्यास संबंधित प्रभागामार्फत निष्कासनाची कार्यवाही करण्यात येते.

• सन २०१५ ते ३१ डिसेंबर, २०२१ अखेरपर्यंत कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या १० प्रभागक्षेत्र कार्यालयामार्फत १०९२२ अनधिकृत बांधकामे निष्कासित केली आहेत तर ४२७ अनधिकृत बांधकामधारकांविरूध्द महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ व महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम १९६६ अंतर्गत गुन्हे दाखल केले आहेत.

• कल्याण-डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रातील आंबिवली, शहाड व टिटवाळा येथे अवैध बांधकामामुळे नागरिकांची फसवणूक झाली, ही बाब वस्तुस्थितीस धरून नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अंतर्गत समाविष्ट गावांना रस्ते विकास योजनांना मंजूरी देणेबाबत**

**(४५) ४८८७१ (२५-०९-२०२२). श्री.संग्राम थोपटे (भोर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (पीएमआरडीए) अंतर्गत समाविष्ट रस्ते विकास कामांना तातडीने प्रशासकीय मान्यता देणेकामी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी महानगर आयुक्त तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (पीएमआरडीए) यांना दिनांक १७ डिसेंबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास रस्त्यांच्या यादीसह निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या संदर्भात शासनाने माहिती व निर्णय घेवून सदरील कामांना प्रशासकीय मान्यता देणेबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा येत आहे ?

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१७-१२-२०२२) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) मा. लोकप्रतिनिधी यांनी मागणी केलेल्या कामांपैकी पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडे उपलब्ध असलेल्या निधीनुसार प्राधिकरणामार्फत ८ कामांना प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे. यापैकी ५ कामे पूर्ण झाली असून, ३ कामे प्रगतीपथावर आहेत. तसेच उर्वरित कामे सन २०२०-२१ मध्ये कोविड-१९ च्या पार्श्वभूमीवर प्राधिकरणास अत्यल्प उत्पन्न प्राप्त झाल्याने मंजूर कामे व योजनांचे दायित्व मोठयाप्रमाणात आहे. प्राधिकरण क्षेत्रातील विविध लोकप्रतिनिधींची मागणी असलेल्या कामांना आर्थिक मर्यादांमुळे प्रशासकीय मान्यता देणे शक्य झालेले नाही.

---

**कल्याण-डोंबिवली (जि.ठाणे) महापालिका क्षेत्रांमधील ई-प्रभाग क्षेत्रातील अनधिकृत बांधकाम विनाविलंब निष्कासित करण्याबाबत**

**(४६) ४८८७४ (२८-०९-२०२२). श्री.भरतशेठ गोगावले (महाड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण-डोंबिवली (जि.ठाणे) महानगरपालिका क्षेत्रांमधील ई-प्रभाग क्षेत्र वार्ड क्रमांक ११५ येथील नांदिवली टेकडी वर गावदेवी तलावाशेजारी अनधिकृतरित्या बांधलेल्या इमारतीवर व अनधिकृत बांधकाम व्यावसायिक श्री.मधुकर म्हात्रे निलेश पाटील आदींवर एमआरटीपी अंतर्गत कारवाई करून सदर आठ मजली इमारतीचे अनधिकृत बांधकाम विनाविलंब निष्कासित करण्यासंदर्भात डोंबिवली (पश्चिम) येथील श्री.जितेंद्र मनोहर वाघमारे यांनी दिनांक १९ ऑक्टोबर, २०२० मध्ये तसेच माहिती अधिकार कार्यकर्ता श्री.राजेंद्र बांदोसकर यांनी दिनांक २० ऑक्टोबर, २०२१ रोजी सविस्तर लेखी तक्रार आयुक्त कल्याण डोंबिवली महापालिका उपायुक्त अनधिकृत बांधकाम विभाग कडोंमपा नगर रचना विभाग, कडोंमपा पोलीस आयुक्त ठाणे शहर इ प्रभाग क्षेत्र अधिकारी कडोंमपा डोंबिवली पूर्व आदींकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू तक्रारीनुसार सखोल चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार सदर अनधिकृत आठ मजली इमारती विरोधात तसेच इमारतीचे बांधकाम करणाऱ्या विरोधात कोणती ठोस कारवाई करण्यात आली आहे,

(४) असल्यास, महाराष्ट्र प्रादेशिक नगर रचना अधिनियम एमआरटीपी कायद्यांतर्गत बांधकामाविरुद्ध कारवाई करणे बाबत याविषयी शासनाने नगर विकास विभाग मंत्रालय शासन परिपत्रक क्रमांक संकीर्ण २०१८ प्रकरण क्रमांक ५१० नवि २०, दिनांक ३ मे, २०१८ नुसार रीतसर सूचना तसेच कार्यपद्धती संदर्भात स्पष्ट आदेश दिलेले आहेत, हे खरे आहे काय,

(५) असल्यास, अनधिकृत बांधकाम विरोधातील कारवाई संबंधी शासनाचे स्पष्ट आदेश असताना सदरहू अनधिकृत बांधकाम निष्कासित करण्याचे दृष्टीने तसेच अनधिकृत बांधकाम करणाऱ्या व्यावसायिका विरोधात आजमितीस एमआरटीपी कायद्याअंतर्गत कोणतीही कारवाई संबंधित अधिकाऱ्यांकडून झालेली नाही इतकेच नव्हे तर या अनधिकृत बांधकामास पाठीशी घालण्याचा प्रयत्न झालेला होत आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, अनधिकृत बांधकाम निष्कासित करण्यास टाळाटाळ करणाऱ्या तसेच अनधिकृत बांधकाम करणाऱ्या बांधकाम व्यवसायिक विरोधात कोणतीही कारवाई न करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यावर जबाबदारी निश्चित करून त्यांचे विरुद्ध कायदेशीर कारवाई तसेच अनधिकृत बांधकाम विनाविलंब निष्कासित करण्याचे दृष्टीने कोणतीही ठोस कारवाई केली आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०७-१२-२०२२) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय.

(३) अनधिकृत बांधकामधारक श्री. मधुकर म्हात्रे व श्री. निलेश पाटील यांच्या विरूध्द मानपाडा पोलीस स्टेशन, डोंबिवली येथे FIR No. ०२५९/२२, दि.०४.०४.२०२२ अन्वये फौजदारी गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

(४) होय, हे खरे आहे.

(५) व (६) सद्यस्थितीत तळ-७ मजली इमारतीचे बांधकाम पूर्ण झाल्याचे निर्दशनास आले असून, सदर इमारतीचे अनधिकृत बांधकाम दि.१५.०७.२०२२ रोजी निष्कासन करण्याचे निश्चित करण्यात आले होते.

• सदर इमारतीचे निष्कासनाच्या कारवाईसाठी पोलीस बंदोबस्त उपलब्ध करून देणेकरीता पोलीस उपायुक्त परिमंडळ-३, कल्याण यांना दि.०५.०७.२०२२ रोजी कळविले.

• सदरहु नांदिवली हे अतिसंवेदनशील गांव असून, तेथील अनधिकृत बांधकामांवर कारवाई करण्यास तेथील नागरिक व संघर्ष समितीचा तीव्र विरोध असतो.

• मात्र, पोलीस विभागाकडून पुरेसा पोलीस बंदोबस्त उपलब्ध झाल्याने दि.०४.११.२०२२ रोजी निष्कासनाची कार्यवाही करण्यात आली असल्याचे, कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेने कळविले आहे.

---

**नाशिक म्युनिसिपल स्मार्ट सिटी डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन (लि) यांनी**
**बनावट देयके सादर करुन केलेला गैरव्यवहार**

**(४७) ४८८९५ (२८-०९-२०२२). श्रीमती सरोज आहिरे (देवळाली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक म्युनिसिपल स्मार्ट सिटी डेव्हलपमेंट कारपोरेशन लिमिटेडने स्मार्ट सिटी योजनेअंतर्गत सन २०१५ मध्ये के.पी.एम.जी. कंपनीला दिलेल्या विकास कामाच्या कंत्राटामध्ये सन २०१५ ते २०१९ दरम्यान कंपनीने सुमारे ४ कोटी रुपयांची बनावट देयके सादर करुन शासनाची फसवणूक केल्याची बाब माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने नमुद केल्यानुसार, सदर ४ कोटी रुपयांची देयके ही प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार कंपनीने सादर केलेल्या पेमेंट शेड्युलनुसार असल्याने सदर देयके बनावट नसल्याचे मुख्य कार्यकारी अधिकारी, नाशिक विशेष वहन यांनी शासनास कळविल्यानुसार मा.स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले तसेच स्मार्ट सिटी, नाशिक व पीएमसी यांच्याकडून मागविण्यात आलेला खुलासा शासनास प्राप्त झाला आहे काय,

(४) असल्यास, सदरहू खुलाश्याची पडताळणी करुन शासनाने कोणती उचित कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१४-१२-२०२२) :** (१) नाशिक म्युनिसिपल स्मार्ट सिटी डेव्हलपमेंट कारपोरेशन लिमिटेडने स्मार्ट सिटी योजनेअंतर्गत सन २०१५ मध्ये के.पी.एम.जी. कंपनीला दिलेल्या विकास कामाच्या कंत्राटामध्ये सन २०१५ ते २०१९ दरम्यान कंपनीने सुमारे ४ कोटी रुपयांची बनावट देयके सादर करुन शासनाची फसवणूक केल्याच्या अनुषंगाने सन्माननीय विधानसभा सदस्यांचे निवेदन शासनास प्राप्त झाले आहे.

(२) (३) व (४) मुख्य कार्यकारी अधिकारी, नाशिक स्मार्ट सिटी लि. यांच्याकडून सदर प्रकरणी खुलासा मागविण्यात आला होता. सदर खुलाशाअंती आयुक्त, नाशिक महानगरपालिका यांना सदर प्रकरणी चौकशी करून शासनास अहवाल सादर करण्याच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मे.लक्ष्य मीडिया लिमिटेडने परवाना शुल्काची रक्कम थकीत ठेवल्याबाबत

**(४८) ४८९२९ (२८-०९-२०२२). श्री.राम सातपुते (माळशिरस) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) एमएमआरडीएने छत्रपती शिवाजी महाराज पुतळा, सांताक्रूझ ते प्रबोधनकार ठाकरे उड्डाणपुल वांद्रेपर्यंत सुशोभीकरण आणि जाहिरातीचे कंत्राट दिलेल्या मे.लक्ष्य मीडिया लिमिटेडने परवाना शुल्कापोटी (लायसन्स फी) १३ कोटी ३० लाख ३३ हजार ९३० रुपये बुडविल्याचा प्रकार निदर्शनास आला असून, या शुल्कात प्रत्येक वर्षाला ५ टक्के वाढ करण्याची तरतूदही करारात असतानाही मे.लक्ष्य मिडियाने शुल्कापोटी २४ कोटी रुपये भरलेले नसल्याची बाब माहिती अधिकारातून समोर आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मे.लक्ष्य मीडियाला माहे सप्टेंबर, २०२० मध्ये १५ वर्षांसाठी जाहिरात आणि सुशोभीकरणाचे कंत्राट दिले असतांना कंपनीने वर्षाला भरावयाचे परवाना शुल्क मागील २० महिन्यांपासून अदा केलेले नसून ही रक्कम २४ कोटी रुपयांच्यावर असल्याने या प्रकरणाची सखोल चौकशी करावी, एमएमआरडीएला देय असलेली २४ कोटीची रक्कम विनाविलंब वसूल करावी तसेच कंपनीचे नाव काळया यादीत टाकावे अशी मागणी माहिती अधिकार कार्यकर्ते यांनी मा.मुख्यमंत्री महोदय यांना माहे मे, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निवेदनान्वये केली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्याच काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१८-१२-२०२२) :** (१), (२) व (३) हे खरे नाही. प्राधिकरणाने पश्चिम द्रुतगती महामार्ग छत्रपती शिवाजी महाराज पुतळा, सांताक्रुज ते प्रबोधनकार ठाकरे उड्डाणपुल ठाकरे (खेरवाडी पुल वगळुन) या दरम्यान महामर्गाच्या मध्यभागी पदचारी मार्ग वाहतूक बेटांचे व बस स्थानकालगत सौंदर्यीकरण व सुशोभिकरण करणे, बसस्थानके, स्ट्री फर्निचर, ई-टॉयलेट, गँट्रीज इत्यादींची संरचना करणे/ उभारणी करणे व देखभाल करणे व चालविणे व त्यावर १५ वर्षाच्या कालावधीकरीता जाहिरात दर्शविणे याबाबतची निविदा प्रसिध्द करुन दिनांक ०७/१२/२०२० रोजीच्या आदेशान्वये जाहिरात प्रदर्शन शुल्क प्रती वर्ष रक्कम रूपये १३,३०,३३,३९०/- + ५% प्रती वर्ष वाढ या दराने मे. लक्ष्य मिडीया लिमिटेड या संस्थेस मंजूर करण्यात आली आहे.

तथापि, मंजूरी प्रदान केलेल्या जाहिरांतीचे प्रकार व दर यानुसार ग्रॅटिस या प्रकारास बृहन्मुंबई महानगरपालिकेने मे लक्ष्य मिडीया लिमिटेड यांना परवानगी प्रदान न केल्यामुळे ग्रॅटीस प्रकारावरील शुल्क वगळता इतर जाहिरातीवरील रु ५०.६१ लाख इतकी रक्कम प्राधिकरणाकडे जमा केली आहे. मे. लक्ष्य मिडीया लिमिटेड यांना जाहिरात व सुशोभिकरणाचे कंत्राट प्रकरणी माहिती अधिकार कार्यकर्ते यांनी दिनांक १८/०२/२०२२ रोजी माहिती अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत प्राधिकरणाकडे माहिती अपेक्षित केली होती. त्याअनुषंगाने प्राधिकरणाकडील माहिती अर्जदारास उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.

(४) प्रश्न उद्भवन नाही

---

## औसा (जि. लातूर) तालुक्यातील भूकंप पुनर्वसित लाभर्थ्यांची प्रकरणे प्रलंबित असल्याबाबत

**(४९) ४८९६८ (२५-०९-२०२२). श्री.अभिमन्यु पवार (औसा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औसा (जि.लातूर) तालुक्यातील भूकंप पुनर्वसित गावातील पात्र लाभार्थी घरे, खुले प्लॉट व कबाले च्यासंदर्भात वंचित असल्याचे माहे जून २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आलेले आहे हे खरे आहे काय

(२) असल्यास, पुनर्वसित गावातील घरे व खुले प्लॉट आणि कबालेच्या संदर्भात सन २०१८ मध्ये जिल्हाधिकारी लातूर यांनी सुनावणी घेऊन प्रकरणे निकाली काढण्याबाबत पुनर्वसन विभागास आदेश दिले आहेत हे ही खरे आहे काय.

(३) असल्यास, घर व प्लॉट मागणीचे तसेच कबाले मागणीचे किती प्रकरणे प्रलंबित असून सदर प्रकरणे निकाली काढण्याबाबत व पात्र व्यक्तींना घरे व प्लॉट वितरित करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत

**श्री. एकनाथ शिंदे (१२-१२-२०२२) :** (१) अंशत: खरे आहे
(२) होय, हे खरे आहे
(३) सन २०१८ मध्ये घर मागणीसंबधी २३, भुखंड मागणीसंबधी १०३, कबाले मागणीसंबंधी १२ अशी एकूण १३८ अर्ज प्राप्त झालेली होती. सदर अर्जावर घर मागणी अर्जासंबंधी शासन निर्णय दिनांक ०१.१२.१९९५ मधील निकषानूसार शिल्लक राहीलेल्या घरांपैकी एकूण ०८ पात्र लाभार्थी यांना घरांचे वाटप तसेच एक लाभार्थी यांना भुखंड वाटप व ५ लाभार्थी यांना कबाले वाटप करण्यात आलेली आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबई-नेरूळ जलवाहतूक सेवा सुरु होण्यास विलंब होत असल्याबाबत**

**(५०) ४९०६५ (३१-१०-२०२२). ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.राजेंद्र पाटणी (कारंजा), श्री.राम कदम (घाटकोपर पश्चिम), श्री.अभिमन्यु पवार (औसा), श्रीमती सीमा महेश हिरे (सीमाताई) (नाशिक पश्चिम), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण), डॉ.संदीप धुर्वे (अर्णी), ॲड.राहूल कुल (दौंड), श्री.रवि राणा (बडनेरा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रस्ते वाहतुकीवरील ताण कमी करण्याबरोबर पर्यावरण पूरक वाहतूक यंत्रणा निर्माण करण्याच्या केंद्र सरकारच्या सूचनेनुसार मुंबई पोर्ट ट्रस्ट, जेएनपीटी आणि मेरीटाईम बोर्ड यांच्या संयुक्त सहकार्याने सिडकोने नवी मुंबई ते मुंबई दरम्यान प्रवासी वाहतूक सुरू करण्यासाठी रुपये १११ कोटी खर्च करून नेरुळ येथे सुसज्ज अशी जेटी बांधली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सिडको आणि महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डातील अंतर्गत वादामुळे नवी मुंबई ते मुंबई दरम्यानची जलवाहतूक सेवा प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त मार्गावरील जलवाहतूक सुरू करण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२१-०२-२०२३) :** (१) व (२) केंद्र शासनाच्या पुर्व किनारपट्टी विकास कार्यक्रमांतर्गत महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड, मुंबई पोर्ट ट्रस्ट व सिडको यांचेकडे अनुक्रमे मांडवा, भाऊचा धक्का व नेरुळ जेट्टीचे विकसित करण्याची जबाबदारी देण्यात आली होती तसेच सदर पायाभुत सुविधा निर्माण झाल्यानंतर जलवाहतुकीची जबाबदारी महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड यांचेकडे देण्यात आली होती.

सिडकोमार्फत नेरूळ जेट्टीचे काम पुर्ण करण्यात आले असुन मेरीटाईम बोर्डने नेरुळ - भाऊचा धक्का, नेरूळ – एलिफंटा व नेरूळ- जेएनपीटी अशा वाहतुकीकरिता जलसेवा देणा-या संस्थांना परवाना जारी करण्यात आला आहे. सिडको संचालक मंडळाच्या मान्यतेनंतर जलवाहतूक संचालक नेमण्यासाठी निविदा प्रक्रिया सुरु असून जलवाहतूक सेवा सुरु करण्याचे नियोजीत आहे.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**राजेन्द्र भागवत**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.